**सुविचार**
सफलता मन की शीतलता से उत्पन्न होती है । ठण्डा लोहा ही गर्म लोहे को काट व मोड सकता है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/गुरुवार दि. ३ ऑक्टेबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-३०२ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## इराणने मोठी चूक केली त्यांना किंमत मोजावी लागेल

### मिसाईल हल्ल्यानंतर नेतन्याहू यांचे खुले आव्हान

नवी दिल्ली: इराणकडून मंगळवारी रात्री झालेल्या हल्ल्याबाबत इस्त्रायलने कडक शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले की, इराणने खूप मोठी चूक केली आणि याची किंमत त्यांना मोजावी लागेल. सुरक्षा कॅबिनेटच्या बैठकीच्या सुरूवातीला नेतन्याहू म्हणाले की जे कोणी त्यांच्यावर हल्ला करतील त्यांना ते प्रत्युत्तर देतील.

सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, इराणने आज



रात्री खूप मोठी चूक केली आणि याची त्यांना किंमत मोजावी लागेल. मी जाफामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मारले गेलेल्या कुटुंबियांच्या प्रती संवेदना व्यक्त करतो तसेच जखमी लोक लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना करतो. मिसाईल हल्ल्याप्रमाणेच या दहशतवादी हल्ल्यामागे एक प्राणघातक मार्गदर्शक हात होता.

जपान, अमेरिकाने दिली ही प्रतिक्रिया इराणने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याप्रकरणी जपान आणि अमेरिकेने निंदा व्यक्त केली आहे. जपानचे नवे पंतप्रधान शिगेरू इशिबा म्हणाले इराणकडून इस्त्रायलवर करण्यात आलेले मिसाईल हल्ले अस्वीकारार्ह आहेत. आम्ही याची निंदा करतो. मात्र

(पान ७ वर)

## पंतप्रधानांकडून महात्मा गांधी व शास्त्रींना अभिवादन

नवी दिल्ली : महात्मा गांधी



आणि देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केलीय. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर फोटोसह श्रद्धांजली संदेश जारी केला आहे.

गांधींच्या १५५ व्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांनी राजघाट येथे जाऊन त्यांच्या समाधीस्थळी अभिवादन केले. यासंदर्भातील संदेशात पंतप्रधान म्हणाले की, सर्व देशवासियांच्या वतीने आम्ही आदरणीय बापूंना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतो. सत्य, समरसता आणि समतेवर आधारित त्यांचे जीवन आणि आदर्श देशवासीयांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहतील असे त्यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे. यासोबतच मोदींनी माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनाही श्रद्धांजली वाहिली.


विजय घाट या शास्त्रींच्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण करून शास्त्रींना अभिवादन केल्यानंतर पंतप्रधान म्हणाले की, ङ्गमाजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. त्यांनी देशाचे सैनिक, शेतकरी आणि स्वाभिमानासाठी आपले जीवन समर्पित केल्याचे पंतप्रधानांनी म्हंटले आहे. (पान ७ वर)

## बनावट सुप्रीम कोर्टात सुनावणी उद्योजकाला सात कोटींचा गंडा

लुधियाना : वृत्तसंस्था

सायबर भामटे कोणत्या थराला जातील, याची कल्पनाही करता येणार नाही. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नावाने बनावट सुनावणी करून अटकेची भीती दाखवून वर्धमान समूहाचे अध्यक्ष एस.पी. ओसवाल (८२) यांना तब्बल ७ कोटी रुपयांचा गंडा घातला गेला. या प्रकरणी सायबर पोलिसांनी आंतरराज्यीय टोळीची ओळख पटविली असून, दोन जणांना गुवाहाटी येथून अटक केली. आरोपींकडून सुमारे ६ कोटी रुपये परत मिळविण्यात यश आले आहे.

एस.पी. ओसवाल यांना २०१० मध्ये पद्म भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सायबर



भामट्यांनी काही उद्योगपतींना अडकविण्यासाठी जाळे विणले होते. ओसवाल यांनी लुधियाना पोलिसांकडे फसवणुकीची तक्रार केली. त्यानंतर, पोलिसांनी बँक खात्यांचा तपास करून या टोळीचा म्होरक्या अतनू चौधरी आणि आनंद चौधरी यांना गुवाहाटी येथून अटक केली.

एका भामट्याने मोबाइलवर कॉल करून आपण दिल्लीतून बोलत असल्याचे सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या नावे अटक वॉरंट जारी केला आहे, तसेच मालमत्ता जप्तीची भीती दाखविली. ईडी, सीबीआय, तसेच कस्टम विभागाचाही दाखला त्यांना देण्यात आला.

दुस-या दिवशी ऑनलाईन सुनावणी सुरू झाली. सर्वोच्च न्यायालयाचा बनाव रचण्यात आला. न्यायाधीश दिसत नव्हते. मात्र, त्यांचा आवाज येत होता. त्यांनी थेट ओसवाल यांची संपत्ती हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले, अन्यथा अटक करा, असे सांगितले. अटक वॉरंटही पाठविला. ओसवाल यांनी वाटाघाटी सुरू केल्या आणि तिथेच ते फसले. वेगवेगळ्या (पान ७ वर)



शहरातील राजीव गांधी चौकातील निलंगा पंचायत समितीचे सदस्य हरीभाऊ काळे यांच्या काळे बिल्डर्स अँड डेव्हलपर्स कार्यालयला डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी सदिच्छा भेट देऊन चर्चा केली. यावेळी प्रशांत काळे, कैलास जगताप (पाटील), सी.ए. संदीप नवटक्के, चाँदभाई शेख, मनोज डोंगरे, आदर्श कॉलनी मॉर्निंग योगा ग्रुप, गणेश कोदळे, अमृत गटागट, पृथ्वीसिंग बायस, अमित जोशी, माणिकराव आलुरे, बलराज खंडोमलकेजी आदी उपस्थित होते.

## जयप्रकाश दगडे यांना जीवन गौरव पुरस्कार

लातूर / प्रतिनिधी- पुणे येथील एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांना जाहीर झाला असून, या पुरस्काराची घोषणा एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. वि.दा. कराड आणि नालंदा विद्यापीठाचे माजी कुलपती डॉ. विजय भटकर यांनी पुणे येथे केली .



विद्यापीठाच्या वतीने पुणे येथे येत्या ३ ते ५ ऑक्टोबर या काळात होत असलेल्या १० व्या जागतिक विज्ञान, धर्म/ अध्यात्म आणि तत्वज्ञान संसद / परिषदे दरम्यान ४ ऑक्टोबर रोजी आयोजिण्यात आलेल्या विश्वशांतीसाठी पत्रकारांची भूमिका ह्या विषयावरील चर्चासत्रातही दगडे सहभागी होणार आहेत. अविरत, निरपेक्ष आणि सामाजिक बांधिलकी ठेऊन आयुष्यभर केलेल्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल (पान ७ वर)



महात्मा गांधी जयंतीनिमित्त आज, २ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर शहरातील हनुमान चौक येथील खादी भांडारला भेट दिली. यावेळी त्यांनी खादीपासून बनलेल्या वस्तूंची खरेदी केली. तसेच याठिकाणी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी चिंतामण गुट्टे, लातूर येथील खादी भंडारचे संचालक बब्रुवान पोतदार उपस्थित होते.



लातूर : लातूर रेल्वे स्थानकासह दोन दिवसांपूर्वी उदगीर स्थानकात बैठक घेऊन प्रवाशांशी संवाद साधला होता. त्यांचे प्रश्न जाणून घेऊन मार्गी लावण्याचे आश्वासनहि दिले होते. त्यानंतर लागलीच दक्षिण मध्य रेल्वेच्या निमित्ताने खासदारांची बैठक पार पडली. यावेळी लातूर लोकसभा मतदार संघातील रेल्वेचे प्रश्न खासदार शिवाजीराव काळगे यांनी मांडले. शिवाय अतिरिक्त रेल्वे गाड्यांचीहि मागणी केली.

## देशात पेट्रोल-डिझेलच्या दराचा भडका उडणार?

मुंबई : - पश्चिम आशियात इस्त्रायल-इराणमध्ये भडकलेल्या युद्धाचा परिणाम भारतासह



जगभरात दिसण्याची चिन्हे स्पष्ट होत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाच दिवसात कच्च्या तेलाच्या किमतीत ५ टक्क्यांची वाढ झाली आहे. हे युद्ध जसे वाढत जाईल तसे कच्च्या तेलाच्या किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचा फटका भारताला बसणार असून पेट्रोल आणि डिझेलच्या दराचा भडका उडण्याची शक्यता आहे.

इस्त्रायलचे लेबनॉनवरील हल्ले आणि त्यानंतर हिजबुल्लाह संघटनेच्या प्रमुखाची हत्या केल्यानंतर इराणने या युद्धात उडी घेतली आहे. मंगळवारी रात्री इराणने सुमारे १८० हून अधिक मिसाईल्स इस्त्रायलवर डागले. त्याला जर इस्त्रायलने प्रत्युत्तर दिले तर आणखी विनाशकारी हल्ला करण्याची धमकीही दिली आहे. त्यामुळे इराण आणि इस्त्रायलच्या युद्धाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

५ टक्क्यांनी दरवाढ : पश्रि्चम आशियातील या घटनेचा परिणाम हा (पान ७ वर)

## दयानंद शिक्षण संस्थेच्या बुधडा कॅम्पसमध्ये वृक्षारोपण



लातूर : दि.०२ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त दयानंद शिक्षण संस्था,लातूर व त्या अंतर्गत असलेल्या सर्वच महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण करण्यात आले.सदरील वृक्षारोपण दयानंद शिक्षण संस्थेच्या बुधडा येथील कॅम्पसमध्ये करण्यात आले.वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावण्यात आली.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष ललितभाई शहा,उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, तसेच अँड श्रीकांतजी उटगे,अँड. आशिषजी बाजपाई,दीनानाथजी भुतडा, सिद्धेश्र्वर कोरे ,उमाकांत केराळे, हरिकिशनजी मालू ,सतीशचंद्रजी चापसी,विशाल अग्रवाल,अशोक पाटील,सागर मंत्री,अँड स्नेहल उटगे,मकरंद सावे,शशिकांत कोटलवार यांच्यासह सर्वच महाविद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,पर्यवेक्षक ,कार्यालयीन अधीक्षक,सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी वृक्षारोपणमध्ये बहुसंख्येने सक्रिय सहभाग नोंदविला आणि परिश्रम घेतले.

## रेणापूर पंचायत समिती फर्निचर व इतर कामासाठी आ.कराड यांच्या प्रयत्नातून साडेतीन कोटीचा निधी

लातूर दि.०२ - रेणापूर पंचायत समिती इमारतीचे बांधकाम गेल्या १० वर्षांपूर्वी झाले असून या इमारतीतील फर्निचर व इतर नूतनीकरण कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तब्बल तीन कोटी ६६ लक्ष ५६ हजार रुपयांचा निधी राज्याच्या ग्रामविकास विभागामार्फत २६ सप्टेंबर २०२४ रोजी च्या शासन निर्णय परिपत्रकानुसार मंजूर झाला आहे.

रेणापूर पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रस्तावित केल्यानुसार, पूर्ण झाले असून प्रस्तुत इमारतीचा वापर गेली १० वर्षापासून करण्यात येत आहे. सदर



इमारतीमधील खराब झालेली फरशी, दरवाजे बदलणे, खराब झालेले प्लास्टर काढून नव्याने प्लास्टर करणे, गळती प्रतिबंधक उपाय करणे, स्वच्छता विषयक जलनि:स्सरणाचे कामे, तसेच प्रस्तुत इमारतीमध्ये शिक्षण, आरोग्य, ग्रामीण पाणी पुरवठा, पशुसंवर्धन, बांधकाम, रोहयो इत्यादी विभागांसाठी टेबल, खुर्ची इ. फर्निचरची व्यवस्था नसल्याने त्याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीच्या बाजूने संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ता व नाले, इतर बाबींची गरज आहे. पंचायत समितीची ही गरज लक्षात घेऊन या कामासाठी निधी मिळावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री मा. गिरीशजी महाजन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने २६ सप्टेंबर २०२४ रोजी च्या शासन निर्णय परिपत्रकानुसार रेणापूर पंचायत समिती इमारतीच्या फर्निचर व इतर नूतनीकरण कामासाठी तब्बल ३ कोटी ६६ लक्ष ५६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे मंजूर झालेल्या निधीतून रेणापूर पंचायत समितीच्या इमारतीला निश्चितपणे नवी झळाळी मिळणार असून ग्रामीण भागातील गावागावातून वाडी वस्तीतून येणाऱ्या लोकप्रतिनिधी बरोबरच सर्वसामान्य नागरिकांना सोई सुविधा मिळण्यास मोठी मदत होणार असून सदरील निधी मिळवून दिल्याबद्दल भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, माजी जिप सभापती सौ. संगिता घुले, पंचायत समिती माजी सभापती सौ. अयोध्या आंबेकर, (पान ७ वर)

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लातूर शहर भूमिगत गटार योजना, वाढीव पाणी पुरवठा योजनेचे दूरदृश्य प्रणालीद्वारे भूमिपूजन



लातूर / प्रतिनिधी- केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत लातूर शहर भूमिगत गटार योजना व वाढीव पाणी पुरवठा योजना, तसेच औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले. नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथील कार्यक्रमातून प्रधानमंत्री यांनी या योजनांचे भूमिपूजन केले. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर उपस्थित होते.

लातूर येथील कार्यक्रमाला लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, श्रीमती कांचन तावडे, मुख्य लेखा अधिकारी रावसाहेब कोलगणे, नगररचनाकार निकिता भांगे, सहायक आयुक्त अजित डोपे, निर्मला माने यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अमृत २.० अभियान अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी २५९ कोटी रुपये निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेंतर्गत लातूर शहरातील वाढती लोकसंख्या गृहीत धरून विस्तारित लातूर शहरास सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी धनेगाव हेडवर्क्स ते हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. लातूर शहर भुयारी (पान ७ वर)

# महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेस कडून अभिवादन











लातूर प्रतिनिधी- लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त तसेच भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त दि.०२ ऑक्टोबर बुधवार रोजी सकाळी काँग्रेस भवन लातूर येथे विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेस लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड किरण जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच सर्व उपस्थित मान्यवरानी देखील विनम्र अभिवादन केले. यानंतर शहरातील महात्मा गांधी चौक येथिल राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले .

यावेळी सुभाष घोडके,कैलास कांबळे,इम्रानसय्यद, ॲड.देविदास बोरुळे पाटील,प्रा.प्रवीण कांबळे, प्रा. सुधीर आणवले,आसिफभाई बागवान,युनूस मोमीन, तबरेज तांबोळी,शेख कलीम,रईस टाके,सुलेखाताई कारेपूरकर,कमलताई मिटकरी,करुणा शिंदे,सिकंदर पटेल,खाजामियाँ शेख,ॲड. अंगदराव गायकवाड, पिराजी साठे,श्रावण मस्के,युसूफभाई बाटलीवाले, जय ढगे,अकबर माडजे,अभिषेक पतंगे,विष्णुदास धायगुडे,कुणाल वागज,युसूफ सय्यद,बब्रुवान गायकवाड,संजय सुरवसे,योगेश देशमुख,संदीपान सूर्यवंशी,मंगेश वैरागे,आबू मणियार,अमोल गायकवाड,राजू गवळी,फारूक शेख,राहुल देशमुख, आकाश मगर,नागनाथ डोंगरे,जफर पटवेकर,श्रीकांत गर्जे,करीम तांबोळी,सोमनाथ तोटाळे यांच्यासह लातुर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

### केशवराज माध्यमिक

दिनांक ऑक्टोबर २०२४ वार बुधवार रोजी श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.मंचावर मुख्याध्यापक श्री संजय कुलकर्णी ,उपमुख्याध्यापक श्री महेश कस्तुरे,पर्यवेक्षक श्री बबन गायकवाड, विद्यार्थी गौरव कुलकर्णी, सायली राऊत, गायत्री जाधव यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

चि. गौरव कुलकर्णी यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित माहिती सांगितली. तसेच कु. गायत्री जाधव हिने लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आधारित साधी राहणी व उच्च विचारसरणी होती. याविषयी मनोगत व्यक्त केले. सायली राऊत हिने अहिंसेचे पुजारी ,युगपुरुष,गांधीवाद,या त्यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय,स्वागत व आभार श्रीमती विपुला उरगुंडे यांनी केले. ५ वी ते १० वी विभागातील सर्व शिक्षकांची व विद्यार्थ्यांची या कार्यक्रमास उपस्थिती होती. हा कार्यक्रम संस्कार मंडळा अंतर्गत घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक श्री महेश कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पर्यवेक्षक,अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्री प्रल्हाद माले संस्कार मंडळ प्रमुख श्रीमती लता कुलकर्णी व व्यवस्थेतील सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले.

### बाभळगाव महाविद्यालय

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादन करण्यात आले. प्रारंभी ग्रंथपाल डॉ. महावीर कटके आणि डॉ.

सुरेशकुमार कांबळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उद्या महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी महाविद्यालयाच्या वतीने जाहीर करण्यात आले. जयंतीच्या निमित्ताने निमित्ताने यावेळी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. माधव गायकवाड, प्रा. विवेक कदम, कार्यक्रमाधिकारी डॉ.दशरथ भिसे, प्रा. संदिपान चेवले, बाळासाहेब देशमुख यांनीही प्रतिमापूजन करून अभिवादन केले.

कार्यक्रमाला प्रा. हरिअर गायके, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. महारुद्र बिडवे, प्रा. संतोष कल्याणकर, प्रा. सोपान डोपे, राजकुमार कांबळे, अंकुश थडकर, दत्ता फुलगामे, नितीन पाटील, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था

श्री वेताळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी , लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक , लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग, लातूर कॉलेज ऑफ सायन्स, यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयात जगाला अहिंसेचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान, जय जवान जय किसान चा नारा देणारे लाल बहादुर शास्त्री यांची जयंती संयुक्तपणे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर आप्पा बावगे,सचिव वेताळेश्वर बावगे , संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्य डॉ श्रीनिवास बुमरेला,प्राचार्य डॉ. विरेंद्र मेश्राम प्राचार्य संतोष मेदगे, प्रभारी प्राचार्या क्षितिजा माळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आले. त्या नंतर शासनाच्या अधीनियमा नुसार महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

प्राचार्य. डॉ श्रीनिवास बुमरेला यांनी मनोगत व्यक्त करताना देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील आढावा घेऊन त्यात महात्मा गांधींची भूमिका स्पष्ट केली. महात्मा गांधींचे विविध सत्याग्रह आणि स्वतंत्र प्राप्ती साठी केलेले अहिंसात्मक प्रयत्न यांची माहिती दिली, व महात्मा गांधींचे विचार कशा पद्धतीने सर्वकालीन महत्त्वाचे आहेत हे सांगताना कार्याची व विचारांचे अनुकरण करन महत्त्वाचे आहे म्हणून गांधी विचार अमलात आणताना आपल्या जवळ असणाऱ्या साधन सामुग्री चा वापर करत स्वावलंबन आणि कृतीशीलता या द्वारे आर्थिक प्रगती साधावी ही महात्मा गांधींची खरी जयंती साजरी केली हे साध्य होईल असे मत व्यक्त केले. तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधीं आणि भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून त्यांनी देशासाठी केलेलं त्याग आणि समर्पण हे गुण अंगिकारल्यास देश खऱ्या अर्थाने महासत्ता होऊ शकेल असे मत प्राचार्य डॉ.विरेंद्र मेश्राम यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाद्वारे करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी प्रा.अतुल कदम प्रा.सुप्रिया जाधव,प्रा. शबनम शेख,शुभम वैरागकर ,महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय

अहमदपूर/ प्रतिनिधी कुमठा बुद्रुक येथील सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अशोकराव पेदेवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून व्ही. जी. पुट्ठेवाड ,डी .आर. जवळे, वसंत वस्तीगृहाचे संचालक आर .एस .राजमाने हे उपस्थित होते .याप्रसंगी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आपले. या कार्यक्रमातच गणेश कोरडे सिद्धेश्वर कोरडे ,मनोज मोठे राव ,वैभव कवठेकर,अमोल लोहार, योगेश गायकवाड़, हर्ष वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त केलें. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल कुटकर, समाधान वायसे यांनी केले तर आभार प्रदर्शन ओंकारेश्वर बिडवे यांनी केलें. याप्रसंगी शाळा स्वच्छता अभियान राबवले गेले यात वसंत वस्तीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

### स्त्रीया आणि बहुजन वर्गाचा सहभाग वाढवून म.गांधींनी स्वातंत्र्य लढ्याचा परिघ विस्तारला

लातूर, दि.०२, येथील असंख्य स्त्रीयांसह अन्य बहुजन वर्गाचा प्राधान्याने सहभाग वाढवून, राष्ट्रपिता म. गांधी यांनी आपल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा परिघ हा आधिक विस्तारला असे प्रतिपादन, प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. अशोक नारनवरे यांनी केले. ते २ ऑक्टोबर रोजी छ. राजर्षी शाहू महाराज उद्यान लातूर येथे, जयभारत प्रभाती मित्र पारिवारांच्यावतीने म. गांधी जयंती निमित्त, आयोजित करण्यात आलेल्या जाहीर व्याख्यानामध्ये प्रमुख वक्त म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त गट विकास अधिकारी प्रा. वसंतराव वाघमारे हे होते. तर विचार मंचावर सामाजिक कार्यकर्ते श्री श्याम वरियाणी व दलित मित्र श्री सुरेशराव चव्हाण याची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

राष्ट्रपिता म. गांधी आणि भारतीय स्वातंत्र्य लढा या विषयावर, आपली अभ्यासपूर्ण अशी विशेष मांडणी करताना, प्रा. डॉ. अशोक नारनवरे हे पुढे म्हणाले की, गांधीजींनी आपल्या पहिल्या लढ्याचा प्रारंभ हा दक्षिण अफ्रिकेतून केला. त्यांनी राजकीय नव्हे तर, ते सामाजिक गुलामीविरुद्ध लढले. ते सन १९१५ मध्ये भारतात परत आले. येथे स्वातंत्र्य चळवळीत नेमस्त, जहाल व क्रांतिकारी असे तीन प्रवाह गट होते. गांधीजींचा संबंध नेमस्तांशी होता. तर लोकमान्य टिळक यांनी राजकीय महत्वकांक्षेप्रमाणे जहाल विचार मांडले. स्वातंत्र्य लढ्यात गांधीजी सोबत महिला, शेतकरी, दलित, आदिवासी असे ब्राह्मणेत्तर होते. आणि टिळकांच्यासोबत शहरी मध्य वर्गीय पांढरपेशी वर्ग होता. त्या पूर्वीच येथे १८८५ मध्ये एक उदारमतवादी इंग्रज अधिकारी एल एम ह्यूम यांनी काँग्रेसची स्थापना केली होती. म. गांधींनी १०२० मध्ये चंपारण्याचा खूप मोठा सत्याग्रह केला. त्यानंतर त्यांनी गिरणी कामगारांचा लढा लढला. पुढे त्यांच्या असहकार आंदोलन व सविनय कायदे भंग चळवळींनी जोर धरला. म. गांधी व डॉ. आंबेडकर हे दोन थोर राष्ट्रीय नेते होते. १९४७ च्या फाळणी नंतर, डॉ. आंबेडकर यांना मुंबई प्रांतातून, संविधान सभेवर पाठविण्यासाठी, स्वतः म. गांधींनी अपार प्रयत्न केले. स्वातंत्र्य लढ्यात गांधी–आंबेडकर यांची भूमिका अत्यंत महत्वाची होती, असेही प्रा. डॉ. नारनवरे म्हणाले.

प्रारंभी म. गांधी यांच्या प्रतिमेस श्री श्याम वरियाणी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, सामूहिक अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ज्येष्ठ समाजिक कार्यकर्ते गणपतराव तेलंगे यांचा व १ ऑक्टोबर रोजी महार रेजीमेन्टला ८४ वर्षे पूर्ण झाल्याने, सेवानिवृत्त मेजर रवि कांबळे यांचा, प्रा. डॉ. अशोक नारनवरे आणि माजी सरपंच माधवराव गायकवाड यांच्या हस्ते शॉल, फेटा, पुष्पहार व गुलाब पुष्प देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी पैलवान दगडू लांडगे, गणपतराव तेलंगे, रवि कांबळे व अध्यक्ष वसंतराव वाघमारे यांची संयुक्त भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामकुमार रायवाडीकर यांनी केले. तर गोपाळतात्या चिकाटे यांनी सूत्रसंचालन केले. आणि संजय व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी रमेशराव केंद्रे, गोविंद कांबळे, श्याम वरियाणी, व्यंकटराव सरवदे, के एम भडीकर, सिताराम पवार, मकबूल शेख वलांडीकर, किशोर भालेराव, दिगंबर बारसकर, पांडूरंग सुर्यवंशी, दिगंबरराव भोसले, मुन्ना पांचाळ आदी उपस्थित होते.

# दसरा महोत्सवनिमीत्त बाभळगाव येथे भव्य रामलीला कथा

लातूर प्रतिनिधी: - बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमित्त रामलीला कथेला प्रारंभ होणार आहे. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वाणीत बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमीत्त नवरात्र महोत्सव समिती, ग्रामपंचायत, सेवा सोसायटी, तंटामुक्ती ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रामलीला कथेस गुरुवार दि. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी श्री व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे प्रारंभ होणार आहे. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते गुरुवार दि. ३ आँक्टोबर रोजी सायंकाळी श्री व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे होणाऱ्या रामलीललेत पहील्या दिवशी श्री गणेश पुजन, श्री हनुमान पुजन, नारदमोहभंग संपन्न होऊन ही रामलीला शनिवार दि. १२ आँक्टोंबर रोजी मेघनाथ वध,रावण वध, भरत भेट,मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम राज्याभिषेक सादर करुन संपणार आहे. श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज रामलीला सादर करणार येणार आहेत, यामध्ये ३० पेक्षा अधिक कलावंत आहेत. स्वामी भुवनेश्वर वशीष्ठजी यांची रामलीला केवळ एक कथा नाही, तर भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारी एक आध्यात्मिक यात्रा आहे. या रामलीला कार्यक्रमाचा सर्व भावीकभक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष नवरात्र महोत्सव समिती बाभळगाव, अध्यक्ष, नवरात्र महोत्सव समिती, बाभळगाव जीवनराव गुंडेराव देशमुख, ग्रामपंचायत सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरंपचं गोविंद देशमुख, विविध कार्यकारी सेवा सोसायटी चेअरमन महादेव गंगाराम जटाळ, व्हा. चेअरमन शिवाजी आप्पाराव जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवराज नागोराव देशमुख व ग्रामस्थ बाभळगाव वतीने करण्यात आले आहे.




**देगलूर येथील समर्थ वाचनालय येथे आज भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले . यावेळी संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत नारलावार, कार्यवाह अविनाशराव देशपांडे हसनाळकर, डाँ.सुरेंद्र आलूरकर , देवेंद्र मोतेवार, नंदकुमार दाशेटवार, चंद्रकांत रेखावार ,नंदू देसाई, ग्रंथपाल पुंडलिक कदम, जयराम गुरूपवार,साहित्यिक विठ्ठल पुठ्ठेवाड, वाचक इत्यादी उपस्थित होते.**

# गोळवलकर गुरुजी विद्यालयात

## म. गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान



देगलूर (प्रतिनिधि): आज येथील परम पूज्यनीय गोळवलकर विद्यालयात म .गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आला. यात शाळेतील ज्ञानोपासक मंडळांतर्गत सर्व विद्यार्थीमंडळ प्रमुखांनी अभियानात सहभाग नोंदवला.

या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक दमन देगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्मिता कुलकर्णी यांनी केले. सर्व शिक्षकांनी तसेच मंडळातील सहभागी विद्यार्थ्यांनी शालेय परिसर, शालेय मैदान, स्वच्छतागृह, तसेच वर्ग खोल्या साफसफाई करून महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन केले. सुरुवातीला विद्यार्थ्यांचा गट करून प्रत्येकाला जबाबदारी वाटप करून स्वच्छता करून घेण्यात आले. यामध्ये सहशिक्षक भानुदास शेळके व विकास देशमुख, राष्ट्रपाल कांबळे यांचे सहकार्य लाभले. शिक्षकांच्या मदतीने मुलांनी शालेय परिसर स्वच्छ केला.

यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबाबतीत आजच्या अनुभवाचा अभिप्राय व्यक्त केला. गांधीजींचे विचार व गांधीजींचे आचार आपल्या प्रगतीसाठी आवश्यक असून आपण त्या गोष्टी नियमितपणे केल्या पाहिजेत असे मत अभ्यासपूरक मंडळ प्रमुख सुरेखा तोटावार यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# अहिंसा तत्त्वाप्रमाणेच प्रसंगानुरुप सशस्त्रतेचा अंगीकार हेच भारतीय सार्वभौमत्वाचे वैशिष्ट्य : प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी



देगलूर (प्रतिनिधी) : भारताला अहिंसा तत्वाची महान परंपरा लाभलेली आहे, स्वातंत्र्यलढ्यातील महात्मा गांधीच्या लढ्याचा मार्गच अहिंसात्मक सत्याग्रहाचा होता, तथापि स्वातंत्र्योत्तर काळात १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर केलेल्या हल्ल्याला लालबहादूर शास्त्रींच्या काळात सशस्त्रतेने अर्थात लष्करी सामर्थ्यानेच लढा देऊन भारताचे सार्वभौमत्व टिकवून ठेवले.

त्यामुळे अहिंसा परंपरे सोबतच प्रसंगानुरूप स्वसंरक्षणासाठी सशस्त्रतेचा अंगीकार हेच भारतीय सार्वभौम प्रजासत्ताकाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ०२ ऑक्टोबर २४ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात प्रथमतः महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री या दोन्ही मान्यवरांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य डॉ. प्रकाश कुकाले तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, आज जागतिक स्तरावर भारताची एक सामर्थ्यशाली देश म्हणून ओळख निर्माण झालेली असून ती समग्र भारतवासीयांसाठी अभिमानाची बाब आहे. याप्रसंगी दोन्ही मान्यवरांच्या ऐतिहासिक कामगिरीवर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. दिगंबर कुलकर्णी यांनी केले .

यशवंत धाराशिव जिल्हा
गुरूवार दि. ०३ ऑक्टोबर २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## काँग्रेसच्यावतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – महात्मा गांधी व माजी प्रधानमंत्री लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांना दि.२ ऑक्टोबर रोजी अभिवादन करण्यात आले.
धाराशिव येथील जिल्हा काँग्रेसच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास काँग्रेसचे मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, डीसीसी बँकेचे संचालक मेहबूबपाशा पटेल, जिल्हा काँग्रेस वरिष्ठ उपाध्यक्ष सय्यद खलील, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, उपाध्यक्ष डॉ. स्मिता शहापुरकर, तालुकाध्यक्ष विनोद वीर, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, माजी नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, ओबीसी जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत,



जिल्हा सरचिटणीस अशोक बनसोडे, महिला प्रदेश स रचिटणीस शिलाताई उंबरे, कानिफनाथ देवकुळे, गोरोबा झेंडे, प्रा.वसंत मडके, प्रभाकर लोंढे, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष स्वप्नील शिंगाडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रेमानंद सपकाळ, महादेव पेठे आदी उपस्थित होते.

# गावकऱ्यांच्या सहकाऱ्यांनेच वरुडा गावचा सर्वांगीण विकास करणार – सरपंच गाढवे





धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – गावात पिण्याचे स्वच्छ पाणी, अंतर्गत रस्त्यांची स्वच्छता, चौवीस तास लाईट, मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासह त्यांच्यात सामाजिक व राजकीय साक्षरता निर्माण करणार. तसेच गावच्या विकासासाठी ज्येष्ठ नागरिकांसह युवक, युवती, महिला व पुरुषांच्या सहकार्याने शासनाच्या विविध विकासात्मक योजना राबवून गावचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे प्रतिपादन सरपंच मिराबाई खंडेराव गाढवे यांनी दि.२ ऑक्टोबर रोजी केले. दरम्यान प्रथमच विशेष ग्रामसभेमध्ये गावातील सर्व महिला पुरुष व जेष्ठ नागरिकांचा फेटा बांधून व गुलाब पुष्प देऊन येतोचित सन्मान करण्यात आला.
धाराशिव तालुक्यातील वरुडा येथे निती आयोगाच्यावतीने.... सर्वांची योजना सर्वांचा विकास.. कार्यक्रमांतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गावातील सर्व ज्येष्ठ महिला व पुरुष यांचा सन्मान, आरोग्य तपासणी व नारळच्या वृक्षांचे वाटप व विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच नारायण मगर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच वैशाली सुनील गंगावणे, ज्येष्ठ नागरिक मथुराबाई गाढवे, माजी सरपंच पांडुरंग गाढवे, माजी चेअरमन शिवाजी मगर व मधुकर शेंडगे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सरपंच मीराबाई गाढवे म्हणाल्या की, वरुडा येथे सर्वांचे आरोग्य सुदृढ विशेषतः सुदृढ बालक, माता, ज्येष्ठ नागरिक व कुटुंबातील सर्व महिला व पुरुष यांचे आरोग्य ठणठणीत रहावे यासाठी विशेष दक्षता घेतली जात आहे. तर पर्यावरणाचा समतोल राखावा यासाठी वृक्ष लागवड व संवर्धन यावर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच घर, परिसर व गावांतर्गत रस्ते पर्यायाने संपूर्ण गाव सुंदर व स्वच्छ रहावे यासाठी सर्वांमध्ये जनजागृती करण्यात आली असून त्याची प्रभावीपणे प्रत्येक जण आम्हाला बजावणी करीत असल्यामुळे स्वच्छ गाव सुंदर गाव बनले असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे गावात कोणत्याही प्रकारचा छोटा मोठा वादविवाद असेल तर ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, पोलीस पाटील, व ज्येष्ठ नागरिक हे प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन ते सोडवीत असल्यामुळे घराघरात सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण झाल्याने गावाची वाटचाल तंटामुक्तीच्या मार्गावर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे कोणत्याही शासकीय योजना राबविण्यासाठी सर्व गावकरी एक जीवाने काम करीत असल्यामुळे योजना राबवत असून उर्वरित योजना राबवून गावचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सरपंच गाढवे यांनी नमूद केले. यावेळी उपसरपंच वैशाली गंगावणे, जयश्री गाढवे, सिंधुबाई गाढवे, आरोग्य सेविका शशिकला धंगेकर, पद्माकर गाढवे, महादेव रोटे, हनुमंत मगर, मेजर बाळासाहेब गाढवे, आगतराव रोटे, सुनील शेंडगे, आकाश गंगावणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी महिला व पुरुष सर्व जेष्ठ नागरिकांचा फेटा बांधून, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. प्रारंभी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची फेरी संपूर्ण गावातून विविध घोषणा देत काढण्यात आली. तर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भारतीय संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी सर्व गावकऱ्यांना नारळाच्या रोपट्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुनील शेंडगे, रेखा गाढवे, आकाश गंगावणे, शिवाजी काळे, पृथ्वीराज मगर, संतोषी गाढवे, रुक्मिणी पवार, लता पवार, पिरामल फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक दिगंबर गांधले, दिनेश शिमनेकर, गांधी फेलो स्वाती गोस्वामी, प्रगती सिंग ,गणेशसिंग रजावत, पत्रकार राजू गंगावणे, तलाठी देशीकराव, कृषी सहाय्यक तेलंगे, आरोग्य सहाय्यक ओहाळ, ग्रामसेवक के माळी, सुनील गंगावणे, लखन गाढवे, जयसिंग गाढवे, अण्णा गाढवे, काकासाहेब गंगावणे, नेताजी गाढवे, बबनराव गंगावणे, बालाजी रोटे, दत्तू गंगावणे, वाल्मीक कोळी आदींसह शालेय विद्यार्थी, युवक, युवती, महिला, पुरुष व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष ग्रामसभेचे प्रास्ताविक ग्रामसेवक के.ए. माळी यांनी तर सूत्रसंचालन सुनील शेंडगे यांनी व उपस्थितांचे आभार सुनील गंगावणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पिरामल फाउंडेशन, युवक व ग्रामस्थांनी प्रयत्न केले.

### प्रथमच महिला, पुरुष व ज्येष्ठ नागरिकांचा ग्रामसभेत सन्मान

## राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने परिसर स्वच्छता अभियान सप्ताहाचा समारोप

मुरूम दि.२ (प्रतिनिधी) – येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून परिसर स्वच्छता अभियान सप्ताहाचा समारोप दि.२ ऑक्टोबर करण्यात आला. दि.२५ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबरपर्यंत विविध भागांची व ठिकाणांची स्वच्छता राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांसोबत घेऊन करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, डॉ. आप्पासाहेब सुर्यवंशी, डॉ. महेश मोटे, डॉ. रविंद्र गायकवाड, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, डॉ. सुभाष हुलपल्ले, प्रा. राजकुमार रोहीकर, डॉ. दिनकर बिराजदार, डॉ. अरुण बावा, डॉ. नरसिंग कदम, डॉ. संध्या डांगे, डॉ. सोमनाथ बिरादार, अशोक कलशेट्टी आदिंची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शिला स्वामी, प्रा. अशोक बावगे, डॉ. विलास खडके, डॉ. नागनाथ बनसोडे, प्रा. अनिल हेबळे, प्रा. सोमनाथ व्यवहारे, प्रा. नाना बेंडकाळे, सुरेखा पाटील, मल्लू स्वामी, दत्तू गडवे, राजानंद स्वामी, लालअहमद जेवळे, श्रावण कोकणे, इसाली चाऊस, महेश कांबळे आदींनी पुढाकार घेऊन परिसराची स्वच्छता केला.

## तेरणाच्या विद्यार्थ्यांची रिलायन्स मॉल मायक्रो काँक्रिट टेक्नॉलॉजीस भेट

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय सिव्हिल विभागाच्या विद्यार्थ्यांनी धाराशिवमधील रिलायन्स मॉलला भेट दिली. या भेटी दरम्यान प्रत्यक्षात प्रॅक्टिकल ज्ञानामध्ये भर देण्यासाठी कास्टिंग ऑफ स्पेशलाईज्ड बीम विथ मायक्रो काँक्रेटींग टेक्नॉलॉजी या नवीन काँक्रिट टेक्नॉलॉजीचा वापर सद्य परिस्थितीत कसा होत आहे ? हे त्यांनी जाणून घेतले.



विकसित भारतामध्ये सिव्हिल इंजीनियरिंग विभागाचा खूप मोठा वाटा असून यामध्ये नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहेत. बऱ्याच वेळेस हेवी डिझाईन आणि जास्त लोड असेल तर काँक्रिट करता येत नाही. अशावेळी पावर ग्राउंट व १० ा ची खडी वापरून मायक्रो काँक्रीट विथ सेल्फ कॉम्पॅक्शन केले जाते. या भेटी दरम्यान या साईटचे अभियंता गिरी यांनी साईटवर सुरू असलेले वेगवेगळ्या प्रकारचे काम आणि त्या अनुषंगाने साईटवर लागणारे डिझाईन्स, टेक्निकल बाबी यांची माहिती दिली. तसेच अल्ट्राटेक सिमेंट कंपनी मार्फत मुलांना साईटवरती करता येणाऱ्या मेटेरीयल टेस्ट संदर्भात प्रत्यक्ष प्रॅक्टिकल करून दाखवले. तर या प्रोजेक्ट जागेचे मालक कुलकर्णी यांनी देखील मार्गदर्शन केले.
यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, सिव्हिल सारख्या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी असून विद्यार्थ्यांना डिग्री बरोबर प्रॅक्टिकल ज्ञानामध्ये भर पडावी म्हणून वर्षभर विविध प्रोजेक्टवर विद्यार्थ्यांना भेटीचे नियोजन केले जाते. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना निश्चित होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सिव्हिल विभाग प्रमुख प्रा.शितल पवार म्हणाले की, विकसित भारतात बांधकाम क्षेत्राला अनन्य साधारण महत्त्व असून आमच्या विद्यार्थ्यांकडून नक्कीच या क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केली जाईल अशी अपेक्षा व्यक्त करीत ते म्हणाले की कौशल्यावर आधारित प्रॅक्टिकल माहिती व्हावी यासाठी या भेटीचे नियोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सिव्हिल विभागांतील सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## ओपन इनोवेशन मॉडेल, स्मार्ट इंडिया हॅकाथॉन स्पर्धेत तेरणाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – एआयसीटीई–एमआयसी विद्यार्थी नियोजित उपक्रमामध्ये तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील महाविद्यालय स्तरावर समाजोपयोगी नवकल्पना घेऊन महाविद्यालयाचे २४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रकल्पांचे परिक्षण महाविद्यालयाच्या तज्ञ प्राध्यापकांनी केले.
यावेळी प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने म्हणाले की, विद्यार्थांमध्ये नेहमीच नवनवीन संकल्पना असतात. त्यामुळे देशातील सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक प्रश्नांची उत्तरे मिळतात. फक्त त्यांना व्यासपीठ मिळणे गरजेचे असते.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या नवनवीन संकल्पना पुढे आल्या. यातील काही प्रयोग निश्चितच भविष्यात पथदर्शी प्रयोग म्हणून मान्यता पावतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या स्पर्धेचा मूळ हेतू म्हणजे देश –विदेशातील प्रश्ने यशस्वी हाताळण्यासाठी नवनव्या संकल्पनांना वाव देण्याचा उद्देश होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्मार्ट ऑटोमेशन, हेरिटेज कल्चर, आरोग्य, शेती, दळणवळण, पर्यटन अशा विविध विषयांवर मांडणी करावी अशी विद्यार्थ्यांकडून अपेक्षा होती. त्या अपेक्षेला प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी ऑटोमेशन क्रॉप प्रोटेक्शन सिस्टीम म्हणजेच मानवी श्रम आणि अवकाळी पावसापासून फळबागांचे संरक्षण यासाठी नवीन प्रकल्प विकसित करून पर्यावरणपुरक प्रकल्पाचे कसे नियोजन करता



येईल ? याचा विचार करून प्रयोग केले. हर्बल ड्रा प्रिपरेशन, कोरोना काळात पॅथॉलॉजी लॅबची गरज व त्यावर पडलेला अतिरिक्त ताण लक्षात घेता ऑनलाईन पॅथॉलॉजी लॅब ही एक नवीन संकल्पना विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रयोगातून मांडली. तसेच आज पिकाचे असो की घराचे संरक्षण हा खूप महत्वाचा मुद्दा बनलेला आहे. याच अनुषंगाने विद्यार्थ्यांनी बॉर्डर सर्वायवल हे नवीन प्रयोग या विषयी त्यांचा प्रोजेक्ट सादर केला. सध्या देशापुढे पाणी हा महत्त्वाचा प्रश्न असून जल संरक्षण कसे करावे ? या संदर्भातही मुलांनी आपला प्रयोग सादर केला. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेक अडथळ्यांना सामना करावा लागला. त्यादृष्टीने खेड्यातील शिक्षण पद्धतीसाठी ऑनलाईन सॉफ्टवेअरचा वापर करून वेगवेगळे प्रयोग करण्यात आले. तर प्रोजेक्ट रूबी म्हणजेच ऑटोमेशन इलेक्ट्रिक स्केटबोर्डची कल्पना समोर मांडली. ओयायसिस द स्मार्ट वॉटर डिस्पेन्सर विथ ऍप आणि नवनवीन वैशिष्ट्ये, दिवसभर लायब्ररी उघडी ठेवण्याचा अतिरिक्त ताण लक्षात घेता लायब्ररी ऑटोमिशन लॅब ही एक नवीन संकल्पना विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रयोगातून मांडली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना नवीन कल्पक कल्पना घेऊन बक्षिसे, प्रमाणपत्र, प्रकल्प अंमलबजावणीच्या संधी व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात भाग घेण्याची संधी मिळणार असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.
तेरणा महाविद्यालयाच्या नियमित परंपरेनुसार समाजोपयोगी नवकल्पना शोधण्याच्या उपक्रमामुळे महाराष्ट्र इनोव्हेशन चॅलेंज या स्पर्धेमध्ये सुद्धा महाविद्यालयाने प्रत्येकी एक लाखाची दोन बक्षीस मिळवली असून अविष्कार, बिजनेस इनोव्हेशन कॉन्टेस्ट व वेगवेगळ्या कंपन्यांकडून आयोजित केलेल्या आयडिया कॉन्टेस्ट यामध्ये विद्यार्थी सक्रिय सहभाग घेऊन सक्रिय सहभाग नवीन कल्पक कल्पना सादर करत आहेत. त्यामुळे महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रिक कार, इलेक्ट्रिक स्कूटर, मानवी रोबोट व ऑटोमॅटिक ड्रिप इरिगेशन सिस्टम यासारखे नवीन प्रकल्प तयार झालेले आहेत.
स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन–२०२४ समन्वयक डॉ. सुशीलकुमार नाथराव होळंबे, सहसमन्वयक प्रा.रवींद्र गुरव, प्रा.डी. बी. ठाकूर, प्रा.डी.बी. भक्ते, प्रा.बालाजी चव्हाण, प्रा. आर.ए. काळे, प्रा.आर.बी. ननवरे यांनी परिश्रम घेतले.

## आ. पाटील यांच्या संकल्पनेतून मातृशक्तीच्या हक्काच्या शक्ती केंद्राची घटस्थापना

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – माता–भगिनींच्या सन्मान आणि सुरक्षेसाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून तेरणा स्त्री शक्ती केंद्र या अभिनव उपक्रमास प्रारंभ होत आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या आशिर्वादाने मातृशक्तीचा सन्मान आणि सुरक्षेच्या संकल्पाची घटस्थापना केली जाणार आहे. जिल्ह्यातील माता–भगिनींच्या अडीअडचणीचे निराकरण तेरणा स्त्री शक्ती केंद्र या उपक्रमांतर्गत महिला कॉल सेंटरच्या माध्यमातून केले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.
माता–भगिनींशी निगडीत असलेल्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी तेरणा स्त्री शक्ती केंद्र या उपक्रमांतर्गत फक्त महिलांसाठी महिलांनी चालवलेले कॉल सेंटर सुरू करण्याची नाविन्यपूर्ण संकल्पना आ पाटील यांनी हाती घेतली आहे. नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी घटस्थापनेचे औचित्य साधत मातृशक्तीच्या आधार व सन्मानाची अनोखी घटस्थापना केली जाणार आहे. यावेळी आ पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील, पोलीस निरीक्षक हिना शेख, ज्यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली, अशा सामाजिक कार्यकर्त्या कोमल कुंभार, कमलताई नलावडे यांच्यासह महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य दीपाली जहागीरदार व तृप्ती भोसले उपस्थित राहणार आहेत. तसेच माता भगिनींच्या वाट्याला येणार्या विविध समस्या आणि अडचणींचे तत्परतेने निराकारण या कॉल सेंटरच्या माध्यमातून केले जाणार आहेत. सामाजिक, शैक्षणिक, विविध उद्योग आणि व्यवसायाशी निगडीत तसेच शासकीय योजना व कामकाज संदर्भात सर्वसामान्य महिलांना येणाऱ्या अडचणी तसेच दुर्दैवाने त्यांच्यावर होणारे अन्याय व अत्याचार आदी समस्या आस्थेवाईकपणे महिला कॉल सेंटरच्या माध्यमातून जाणून घेतल्या जातील. त्यानंतर या समस्या वेगवेगळ्या शासकीय आणि प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून कमीत कमी वेळेत तत्परतेने दूर करण्याचा प्रयत्नही याद्वारे केला जाणार आहे. महाराष्ट्राची



कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या आशिर्वादाने सुरू करण्यात आलेल्या मातृशक्तीच्या सन्मानाची ही घटस्थापना माता–भगिनींसाठी नक्की महत्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे. आपल्यासमोर निर्माण झालेल्या अडचणी निःसंकोचपणे महिला कॉलसेंटरकडे फोनद्वारे नमुद कराव्यात, त्या दूर करण्याची जबाबदारी माझ्यावर असेल अशी ग्वाही देखील आ. पाटील यांनी दिली आहे.

## ठाकरे नगर नवरात्र महोत्सव विविध कार्यक्रमांनी होणार साजरा

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – शहरातील बाळासाहेब ठाकरे नगर येथे ठाकरे नगर नवरात्र महोत्सव चे दि.३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे देवी प्रतिष्ठापना ते मिरवणुकीपर्यंतच्या सर्व कार्यक्रमांचे आयोजन व नियोजनची जबाबदारी महिलांकडे सोपविण्यात आली असून खऱ्या अर्थाने महिला शक्तीचा सन्मान केला आहे. दि.३ ऑक्टोबर रोजी येडेश्वरी मंदिरातून देवीची पायी ज्योत आणण्यात येणार आहे. दरम्यान २ ऑक्टोंबर रोजी साडेतीन शक्तीपीठातून आणलेले आदिशक्ती आदिमाया देवींच्या चरणीचे कुंकूरुपी आशीर्वाद कुंकू व घटस्थापनेसाठीचे वाण घरोघरी वाटप करण्यात आले. नवरात्र महोत्सवातील कार्यक्रमाचा देवीभक्तांसह सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ठाकरे नगर नवरात्र महोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रमुख प्रशांत साळुंके यांनी केले आहे. या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रम राबविले जात असल्यामुळे सर्व समाजातील नागरिक यामध्ये स्वतःहून सहभाग नोंदवीत आहेत. या नवरात्र महोत्सवाच्या आधारस्तंभ शामल साळुंके तर अध्यक्षा म्हणून सुरेखाताई खांडेकर, उपाध्यक्षा सत्यशीला गायकवाड, सचिव प्रतिभा गाडे व मिरवणूक प्रमुख म्हणून लता इंगळे, श्रद्धा उगलमोगले यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर रांगोळी प्रमुख शिवानी कोळी, योगिता निलंगे तर आरतीचे नियोजन कोमल कदम व वर्षा डोके यांच्याकडे तसेच भोगी प्रमुख म्हणून मीनाक्षी महामुनी व मंगल सलगर, स्पर्धाप्रमुख म्हणून निकिता सिरसट व दिपाली चौधरी तसेच देवी आणण्याचे नियोजन रेखा शिंदे व दिपाली गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. महाप्रसादाचे नियोजन रुक्मिणी सुर्यवंशी, सुरेखा पवार, अनारकली शिंदे व सत्यभामा खोत तसेच होम विधीचे नियोजन शितल कसपटे व इंदू जगताप यांच्याकडे तसेच दांडिया प्रमुख म्हणून लता राठोड, शुभांगी काळे व राणीताई काळे यांच्याकडे तर आराधी गीत प्रमुख म्हणून अनिताताई शेंडगे व विमल साठे तर कुंकूमार्चनचे नियोजन योजनाबाई सलगर, अर्चना सोनटक्के व पूजा वाघमारे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

### मुलांसाठी स्पर्धा, दांडियाचेही आयोजन

महोत्सव काळात लहान मुलांसाठी रंगसंगती स्पर्धा घेण्यात येणार असून १० ऑक्टोंबर रोजी मुक्त दांडियाचेही आयोजन करण्यात आले आहे. दांडियामधील विजेत्यांना बक्षीस देण्यात येणार असून प्रतिव्यक्ती १०० रुपये प्रवेश शुल्क ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमांचे सर्व नियोजन महिलांकडे देऊन खऱ्या अर्थाने महिला सशक्तिकरण करण्याचे काम या उत्सव मंडळाच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे.




### देवी मंडपात आराध्यांची गाणी

घटस्थापनेपासून दररोज देवी मंडपामध्ये सायंकाळी देवींची आराधी गाणी सादर केली जाणार आहेत. यामध्ये दि.३ ऑक्टोबर रोजी आराधी गाणी, दि.४ ऑक्टोबर रोजी पोपट खिल्लारे, दि.५ ऑक्टोबर रोजी चांदनाबाई कांबळे, दि.६ ऑक्टोबर रोजी दादा माळी (अंबेजवळगे), दि.७ ऑक्टोबर रोजी किशोर धुत (बीड), दि.८ ऑक्टोबर रोजी सांजा येथील आराधी मंडळ, दि.९ ऑक्टोबर रोजी बोंदर (उत्तमी कायापुर), दि.१० ऑक्टोबर रोजी साखरबाई टेकाळे व विष्णू देडे तर दि.११ ऑक्टोबर रोजी वैराग येथील आराधी मंडळ तसेच दि.१२ ऑक्टोबर रोजी होम विधीनंतर दसरा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

**शारदीय नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने दररोज एक या प्रमाणे नऊ दिवसांमध्ये देवीच्या नऊ रूपाची पुजा केली जाते घटाच्या स्वरुपात तिची स्थापना घरोघरी केली जाते. तेव्हा पहिल्या देवशी माता शैलपुत्रीची देवीची पुजा असते या प्रमाणे ११ ऑक्टोबर पर्यंत देवीच्या विविध रुपांची संक्षिप्त माहिती . डॉ. सौ. वनीता आग्रे पटवारी यांनी दैनिक यशवंत या वृत्तपत्रातून आमच्या वाचकांना उपलब्ध करत आहोत... – संपादक**

## सर्वमंगल्ये मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके, शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते

## १ शैलपुत्री देवी



शारदीय नवरात्र उत्सवाच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा, अश्विनी शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यंत आपल्याकडे शारदीय नवरात्र साजरा करण्यात येतो. तीन ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर या दरम्यान हा नवरात्रीचा उत्सव आहे या अंतर्गत सगळीकडे भक्तीमय वातावरण नवरात्रीचा जल्लोष दांडिया, गरबा, ,उत्साह आनंददायी वातावरण आपल्याला पाहायला मिळतो यादरम्यान नऊ दिवसाचा उपवास ,भजन, कीर्तन, आरती, प्रसाद अशा अनेक स्वरूपातभक्ती पाहायला मिळते. सगळीकडे जयघोष होत असतो अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत मनोभावे शुद्ध अंतकरणाने देवीला नमस्कार केला जातो .

नऊ दिवसांमध्ये देवीच्या नऊ रूपाची पूजा केली जाते घटाच्या स्वरूपात तिची स्थापना ही घरोघरी केली जाते वेगवेगळ्या फुलांनी, पानांनी तिची पूजा अर्चना अगदी भक्तीमय वातावरणात केली जाते .नवरंगाच्या साड्या खना नारळाने तिची ओटी भरली जाते नवरात्रीत नऊ रूपाच्या देवीच्या पूजेमुळे आपल्या मनात सात्विक भाव निर्माण होतो.आपण या नऊ देवीची पूजा रोज एका रुपात करतो. पहिल्या दिवशीची देवीची पूजा ही माता शैलपुत्रीची असते .माता शैलपुत्री ही हिमालयाच्या पर्वतराजाची कन्या आहे म्हणूनच तिला शैलपुत्री म्हटले जाते जिच्या उजव्या हातात त्रिशूल आणि डाव्या हातात कमळाचे फुल असते शैलेपुत्री देवी पूर्व जन्मात प्रजापती दक्ष राजाची कन्या होती तिचे नाव सती व तिचा विवाह शंकराशी झाला होता. एकदा राजा प्रजापतीने मोठा यज्ञ केला होता या यज्ञासाठी त्यांनी सर्व देवी देवतांना आमंत्रीत केले. परंतु शंकराला निमंत्रण दिले नाही . सतीने वडीलांच्या यज्ञ समारंभास जाण्याची इच्छा आपल्या पतीकडे व्यक्त केली .शंकराने तिला समजावले राजा आपल्यावर नाराज आहेत तिथे जाणे योग्य नाही परंतु सतीला आपल्या आई-वडिलांना भेटण्याची तीव्र इच्छा झाली, म्हणून यज्ञ पाहण्यासाठी ती गेली , परंतु शंकरांच्या म्हणण्याप्रमाणे तिथे तिला कोणी गळाभेट किंवा ओळख सुद्धा दिलेली नाही .सतीला याचे फार वाईट वाटले व दुःखही झाले आपला व आपल्या पतीचा शंकराचा अपमान तिला सहन झाला नाही सतीने स्वतःला यज्ञकुंडात अर्पण केले. ही वार्ता जेव्हा शंकराला कळाली तेव्हा त्यांनी आपल्या गणांना पाठवून प्रजापतीचा संपूर्ण यज्ञ उध्वस्त केला. हीच सती पुढील जन्मी शैलराज हिमालयाच्या कन्येच्या रूपात जन्म घेतली तिचा विवाह शंकराचीच झाला तीच ती शैलपुत्री देवी जिला पार्वती हे हेमवती या नावाने सुद्धा ओळखले जाते तिची नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मोठ्या थाटामाटाने स्थापना करून हर्ष उल्हासानेआणि मनोभावे पूजा केली जाते तिला दूध आणि साखरेचा नैवेद्य दाखवला जातो.नावे अनेक पण रूप एक असणारी दुर्गा ,शैलपुत्री ,शक्तीचा महिमा अनंत आहे शैलपुत्री देवीची मनोभावे पूजा करून आणि सुख, शांती ,समृद्धी मिळो हीच प्रार्थना करून देवीला वंदन करूया.



**- डॉ. वनिता आग्रे पटवारी**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**

## दिलीपराव देशमुख यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रधान

लातूर- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना मानाचा सहकारमहर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ नुकताच प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या मान्यवरांना मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात येत असतो. यावर्षी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर रोजी हा सोहळा लातूर येथील दयानंद सभागृहात ह. भ.प. गहिनीनाथ महाराज, खा. डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे,राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे दिल्ली, जेष्टपत्रकार जयप्रकाश दगडे, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी,जिल्हाध्यक्ष अशोक देडे,प्रा.विठ्ठल कांगणे आदींच्या उपस्थितीत पार पडला. परंतु याच दिवशी पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख बाहेरगावी गेले होते. त्यांनी केलेल्या सहकारातील कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांची यावर्षीच्या मानाचा सहकार महर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ साठी निवड केली असल्याने त्यांना आशियाना बंगल्यावर जाऊन जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते व जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रा.यु.डी. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी,शहराध्यक्ष महादेव डोंबे यांनी त्यांना सन्मानित केले.

## रोटरी परिवार लातूर यांच्या तर्फ ३१४ अपंग बांधवांना मोफत जयपूर फूट चे वाटप



लातूर / प्रतिनिधी- रोटरी क्लब लातूर परिवाराच्या वतीने लातूर व परिसरातील ३१४ अपंग बांधवाच्या साठी जयपूर फूट चे कृत्रीम हात पाय चे मोफत वाटप रोटरी क्लब परिवार लातूर व रत्ननिधी चारीटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने करण्यात आले .

ऑगस्ट २०२४ मध्ये तीन दिवशीय शिबीरात तीन शे चौदा रूगणांचे कृत्रीम हात पाय बसविण्यासाठी मोजमाप घेण्यात आले होते त्या साहित्या चे वितरण दिनांक ३० सप्टेंबर व १ व २ ऑक्टोबर २०२४ रोजी वीरशैव भवन खंडोबा गल्ली येथे विशेष कार्यक्रमात रोटरी चे माजी प्रांतपाल विजयभाऊ राठी व नियोजित प्रांतपाल सुधीर लातूरे यांच्या उपस्थित वाटप करण्यात आले.

लातूर शहर व परिसरात गेल्या चार वर्षा पासून रोटरी क्लब लातूर परिवार यांच्या वतीने या शिबीराचे आयोजन करून अपंग बांधवांना सक्षम होण्यासाठी आधार दिला जातो या वर्षी च्या शिबीरात नवीन तंत्रज्ञान पध्दतीने पाय बसविण्यात आले आहेत बाजार मुल्य एक लाख रूपये असून तो पूर्णपणे मोफत बसविण्यात आले आहेत शिबिराच्या यशस्वी शिबीर समन्वयक मेघराज बरबडे प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र सुराणा , नरेश कोरे, चंद्रकांत बारस्कर , अमित पुरबूज , कालिदास लांडगे,महादेव पांडे , संजिवनी कडतने राजकुमार मुंदडा, संतोष कासले व रोटरी सदस्य यांनी परिश्रम घेतले.

आत्मबोध २६

जीवन झाले का सफळ ।
जाणू आता केवळ ।
आता तरी काळ ।
सार्थकी लावू ।। १ ।।

मनुष्य जन्मा आलो ।
काय मी पावलो ।
आजपर्यंत गेलो ।
कोणा मागे ।। २ ।।

करू आता चिंतन ।
काय करावे वर्तन ।
ऐकू आता कीर्तन ।
भगवंताचे ।। ३ ।।

मार्ग दाविती संत ।
जाऊ त्या पंथ ।
नाही राहणार खंत ।
जीवनात ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
१०/०२/२०२२

## शाहू महाविद्यालयात जिल्हास्तरीय अविष्कावर महोत्सव-२०२५ संपन्न



लातूर (प्रतिनिधी) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व शिव छत्रपती शिक्षण संस्था, द्वारा संचलित राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दि ३० सप्टे. २०२४ रोजी जिल्हास्तरीय संशोधन अविष्कार महोत्सव – २०२५फ चे आयोजन करण्यात आले. या अविष्कार महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातीलसहाविद्याशाखेतून विविध महाविद्यालयातील २२२ संशोधक विद्यार्थ्यांनी मानवता, भाषा, ललित कला, वाणिज्य व व्यवस्थापन, कायदा, विज्ञान, कृषी, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यकीय व फार्मसी अशा अनेक विषयांच्या संशोधनावर आधारित पोस्टर प्रदर्शनातून आपले अविष्काराचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, प्रमुख पाहुणे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील डॉ. वैजंता पाटील, डॉ.एच. जे. भोसले, समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. शैलजा वाडिकर, विद्यापीठाचे अविष्कालर समितीचे समन्वैयक डॉ. काशिनाथ बोगले, डॉ. भास्कर आगलावे, परीक्षक डॉ. अविनाश कदम, डॉ . निशिकांत वरभुवन, डॉ. बी.पी. रोडगे, डॉ. नितीन काळकुंडे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, महोत्सवाचे जिल्हा समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर राठोड, यांच्या हस्ते प्रत्येक विद्याशाखेतून गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्या संशोधक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.

या अविष्कार महोत्सवात मानवी भाषा आणि ललित कला प्रकारात देवशटवार ऋचा, पाटील गीता, गीरी प्रगती, फुलारी रूक्सार, कुलकर्णी मंगेश, तलवारे विश्वगंधा, थोरात वैशाली, चव्हाण अजय यांनी यश संपादन केले. वाणिज्य आणि व्यवस्थापन गटातून सायली हैद्राबादे, टाकभायटे ऋतुजा, शिंदे पुजा, अलटे अभिक्रांत, मोहिते सरीता, नरनावरे महेश, संपदा काळे यांनी यश संपादन केले. विज्ञान शाखेतून भार्गवी पाटील, पुजा गरड, शेख मौला, राधिका राजे, योगेश्वरी डुकरे, तनया नाईकवाडे, महेश जाधव, जयश्री स्वामी, यांनी यश संपादन केले. कृषी व प्राणीशास्त्र विभागातून अंबर जान्हवी, जाधव तन्मय, शिंदे सक्षम, बागळे प्रसाद, यादव मोहिनी, येडले वैभव, जगताप धनश्री, धुतेकर शैलजा, यांनी यश संपादन केले. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागातून जाधव आदित्यनाथ, पाटील अथर्व, मठपती गणेश, भुजबळ अक्षय, वेदे ऋतुजा, डोंगरे ऋषिकेश, देशमुख संभाजी, जगताप कल्पना यांनी यश संपादन केले. औषधनिर्माण शास्त्र विभागातून मोरे तनुजा, शेख सलमान, सूर्यवंशी प्रिती, सुपेकर प्रतिक्षा, दुर्गा पाटील, जाधव दिपक, शेटकार संचिता, मनाळे महोरन यांनी यश संपादन केले. या सर्व यशवंत संशोधक विद्यार्थ्यांचे मंचावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, महाविद्यालयातील नॅक चे विशेष कार्यासन अधिकारी तथा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष चे समन्वयक डॉ. अभिजीत यादव व अविष्कार महोत्सवाचे जिल्हा समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर राठोड, डॉ. काकासाहेब राऊत, प्रा. धनश्री जगताप, प्रा. दत्ता नल्ले, प्रा. प्रतिक्षा पाटील, प्रा. नसरीन शेख, श्री फरदीन शेख आणि विभागातील विद्यार्थ्यांनी या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे निकाल वाचन व आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश रोडिया यांनी केले. तर सूत्रसंचालन शेख फरदीन व शेख आफ्रीन यांनी केले.

## घामाच्या अभिषेकातून राष्ट्र निर्मिती होते : डॉ. सोमनाथ रोडे



देगलूर(प्रतिनीधी): जेष्ठ नागरिकांच्या घामाच्या अभिषेकातूनच कुटुंब, समाज आणि राष्ट्राची निर्मिती होते असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ सोमनाथ रोडे यांनी केले.ते देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ.संजय पाटील, डॉ.रत्नाकर लक्षटे तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय देबडे , सामाजिक न्याय विभागाचे तुकाराम धुमाळे हे मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांचे पुष्पहाराने स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम धुमाळे यांनी केले.या प्रसंगी डॉ संजय पाटील यांनी पर्यावरण आणि जेष्ठ नागरिक यावर तर डॉ . लक्षटे यांनी दिव्यांग आणि तृतीय पंथी या विषयावर आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ सर्जेराव रणखांब आणि केले तर आभार डॉ संजय देबडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरगी मध्ये म.गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी

### बालिका पंचायत द्वारा ग्रामस्वच्छता अभियान राबवून दिला कृतिशील संदेश



देगलूर(प्रतिनीधी): आज तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व बालिका पंचायत राज समितीच्या वतीने ग्राम स्वच्छता अभियान राबवून सर्वांना कृतिशील संदेश दिला.

आज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सकाळी आठ वाजता महात्मा गांधी आणि पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी म.गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक अशोक देवकत्ते व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन भोकसखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास बालिका पंचायत राज समिती चे सरपंच अंजली वाघमारे,सचिव महादेवी दानेवार ,रुद्रानी चेंडकें कु. बरसमवार,शाळेतील शिक्षक ईश्वर वाडीकर,रमाकांत वाघमारे, भुमन्ना तेलंगे,सिद्धेश्वर कुंटे ,गावातील प्रतिष्ठित युवक प्रभाकर कालींगवार, इरवंत काळींगवार,अंगणवाडी कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली.तसेच बालिका पंचायत राज च्या पदाधिकाऱ्यांनी सुद्धा मार्गदर्शन केले.

शाळेतील या कार्यक्रमानंतर स्वच्छता अभियानाची सुरुवात केली.सर्वजण हातात खराटा घेऊन शाळेचा परिसर,मंदिराचा परिसर,संपूर्ण गावातील रस्ते व परिसर स्वच्छ केला.

हा स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी बालिका पंचायत राज चे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पुनम सुर्यवंशी, ग्रामसेवक महादेवी दाणेवार, ग्रामपंचायत सदस्य शिवकांता भुरळे, रोहिणी दाणेवार, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष सपना कालींगवार, महादेव प्रभाकर गादगे, महादेव गोशट्टी, श्रीदेवी धाकपाडे, रूद्राणी चेंडके, आश्विनी पांचाळ,तंटामुक्त अध्यक्ष शिवाणी मठपती, पोलिस पाटील अनिता बागेवार आदींनी परिश्रम केले.

## मस्टरवरून निवृत्ती झालो,सेवेतून नाही: प्रा.भोसले



मुक्रमाबाद(प्रतिनीधी): मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील श्री.छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.अरुण भिमराव भोसले हे दि. ३० सप्टेंबर रोजी २९ वर्ष सेवा करुन सेवानिवृत्त झाले. ते इतिहास व राज्यशास्त्राचे उत्तम प्राध्यापक म्हणून विद्यार्थीप्रिय होते.त्यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ काल १ आक्टोबर रोजी श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाकडून आयोजित करण्यात आला होता.यावेळी प्रा.भोसले यांनी मी मस्टरवरून निवृत्त होत आहे,सेवेतून कधीही निवृत्त होणार नाही,असे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव व्यंकटराव पाटील गोजेगावकर हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र(बबन) पाटील, बाबुराव पाटील आंदेगावकर, प्राचार्य मुकुंदराज जाधव, प्राचार्य डॉ. विवेक इनामदार हे होते.

प्रा.भोसले सरांचे संस्थेच्या उभारणीपासून मोठे योगदान आहे.त्यांच्यासारखे विद्यार्थीनिष्ठ शिक्षक आता दुर्मिळ झालेत,असे मत व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी मांडले. प्रा.भोसले यांनी अनेक गरीब-गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी संपूर्ण मदत केली असे मत त्यांचे माजी विद्यार्थी शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी मांडले.यावेळी अनेक आजी माजी विद्यार्थ्यांचे मनोगत झाले.

कार्यक्रमाला अजित पाटील तोडचिरकर,अच्युतराव कदम, हरिपाल कदम, अरुणराव कदम, प्रा. विलास भोसले, शिवाजी भोसले, जगदीश भोसले, धनंजय भोसले मुक्रमाबाद नगरीतील डॉक्टर वृंद, परिसरातील प्राध्यापक-शिक्षक वृंद, पत्रकार , माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, संपूर्ण सहकारी उपस्थित होते.

प्रा. अरुण भोसले यांना निरोप देतांना विद्यार्थी, सहकारी, कर्मचारी यांना भावना अनावर झाल्या होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मुकुंदराज जाधव यांनी तर सूत्रसंचालन व आभार डॉ.खराबे यांनी केले.

## जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयास एकूण ९ पारितोषिके




लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय संशोधन महोत्सव आविष्कार-२०२५ स्पर्धेत दयानंद विज्ञान महाविद्यालयास एकूण ०९ पारितोषिके मिळाली. त्यामध्ये आदिनाथ जाधव या विद्यार्थ्याने इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी युजी गटातून प्रथम क्रमांक मिळविला तर गणेश मठपती या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक मिळविला.तसेच कल्पना जगताप या विद्यार्थीनीने इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी पीपीजी गटातून द्वितीय क्रमांक मिळविला.भाग्यश्री पाटील या विद्यार्थिनीने प्युअर सायन्स युजी गटातून प्रथम क्रमांक मिळवला तर योगेश्वरी डुकरे या विद्यार्थिनीने पीजी गटातून द्वितीय क्रमांक पटकाविला. जान्हवी अंबर या विद्यार्थिनीने ग्रिकल्चर अँन्ड निमल हसबंडरी युजी गटातून प्रथम क्रमांक मिळविला.प्रतिक्षा सुपेकर या विद्यार्थिनींनीने मेडिसिन अँन्ड फार्मसी पीजी गटातून प्रथम क्रमांक मिळविला. प्रगती गिरी या विद्यार्थिनीने हयुमॅनिटिज लॅग्वेज,फाइन आर्टस् युजी गटातून तृतीय क्रमांक मिळवला तर पीजी गटातून विश्वगंधा तलवारे या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकाविला.

त्याबद्दल दि.०१ ऑक्टोंबर २०२४ रोजी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या शुभ हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड,प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ. पुनम नाथानी,प्राचार्य डॉ.प्रीती पटवारी, प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस,आविष्कार स्पर्धा समन्वयक व संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, सहसमन्वयक विश्वनाथ मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी विद्यार्थ्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या व विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत घवघवीत यश संपादन करावे असेही सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.दीप्ती ढेरे यांनी मानले.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील व डॉ.संध्या कोल्हे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,आविष्कार स्पर्धा कमिटी सदस्य डॉ.महादेव पंडगे, डॉ.महेश करळे,प्रा.श्वेता मदने यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.त्यांनीही विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com



## करीना कपूरने कतरिना कैफला मानली होती आपली वहिनी, रणबीरच्या लग्नासाठी केली होती जोरदार योजना!

मुंबई -रणबीर कपूरच्या चित्रपटांपेक्षा त्याच्या लव्ह लाईफचीच जास्त चर्चा होते. रणबीरचा भूतकाळ नेहमीच लोकांच्या चर्चेचा विषय असतो. आता जरी त्याने आलिया भट्टशी लग्न केले असले, तरी त्याला एक मुलगी राहा देखील आहे. पण एक काळ असा होता, जेव्हा त्याचे नाव कतरिना कैफसोबतही जोडले गेले होते. त्यांच्या प्रेमाच्या चर्चा इंडस्ट्रीत खूप होत होत्या. कतरिना कैफबद्दल असे म्हटले जाते की तिने रणबीर कपूरसाठी सलमान खानलाही सोडले होते. कतरिनाने रणबीरसोबत लग्नाचे स्वप्नही पाहिले होते.

पण हे होऊ शकले नाही. मात्र, करिना कपूरनेही रणबीर-कतरिनाच्या लग्नाबाबत आपले प्लॅन बनवले होते. रणबीर कतरिनाशी नक्कीच लग्न करेल



यावर कपूर कुटुंबातील जवळप-ास सर्वांनीच एकमत केले होते. एका रिपोर्टनुसार, रणबीर-कतरिना लिव्ह-इन रिलेशनशिपमध्येही होते. सध्या सोशल मीडियावर एक जुना व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या चॅट शोमध्ये करीना आणि रणबीर एकत्र दिसत आहेत.या व्हायरल क्लिपमध्ये, करीना कपूर रणबीरला म्हणते, ''मी तुझ्या लग्नात एकटीच नाचणार, नक्कीष्ठचिकनी चम ेली, शिला की जवानीष्ठफक्त कतरिना कैफच्या हिट गाण्यांवर.'' सुरुव-ातीला रणबीर आणि करण दोघेही करीनाला प्रतिसाद देत खूप हसताना दिसत आहेत. मग रणबीर म्हण-तो, अहोष्ठ ती इतकं बोलत आहेष्ठ असे झाले तरष्ठ करण जोहर म्हणतो, ''आम्हीही तेच बोलतोय, लग्न झाले तरष्ठ तर कधी?करीना कपूरने तिचे म्हणणे पूर्ण केले आणि रणबीरला सांगितले की मी तुला सांगत आहे की माझा पोशाख तयार आहे. रणबीर होय असे उत्तर देतो आणि लाजतो. तोपर्यंत दीपिका पदुकोणनंतर रणबीर कतरिना कैफशीच लग्न करेल, अशी सर्वांना अपेक्षा होती. पण असे घडले नाही, हे सर्वांना माहीत आहे. कतरिनासोबत ब्रेकअप झाल्यानंतर रणबीरने आलिया भट्टला डेट केले आणि तिच्याशी लग्नही केले.



## शाकाहारी असण्याचे आहेत अनेक फायदे, पण होतात 'हे' तोटेही

दरवर्षी जागतिक शाकाहारी दिवस १ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. शाकाहारी असण्याचे काय फायदे आणि तोटे आहेत हे जाणून घेऊयात. शाकाहारी असण्याचे आहेत अनेक फायदे, पण होतात 'हे' तोटेही

दरवर्षी जगभरात १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक शाकाहारी दिवस म्हणून साजरा केला जातो. आजकाल शाकाहार स्वीकारणाऱ्यांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. आरोग्याच्या कारणांमुळे लोक मांसाहार दूर करून शाकाहाराकडे वळत आहेत. जागतिक शाकाहारी दिवसाची सुरुवात १९%% मध्ये झाली. या दिवसमागचा उद्देश शाकाहारी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा आहे. शाकाहारी असण्याचे अनेक फायदे आहेत परंतु त्याचे काही तोटेही आहेत. चला याविषयी सविस्तर जाणून घेऊयात.

हृदय राहते निरोगी

शाकाहारामुळे कमी सॅच्युरेटेड फॅट शरीरात जातात. यामुळे खराब कोलेस्ट्रॉल वाढण्याची शक्यता कमी होते. एवढेच नाही तर रक्तदाब नियंत्रणात राहते. या कारणांमुळे हृदय निरोगी राहते.

पचनक्रियाही उत्तम राहते

मांसाहारापेक्षा शाकाहारी अन्न पचायला नेहमी सोपे असते. शाकाहारी पदार्थात फायबरही चांगल्या प्रमाणात आढळते. फायबरमुळे पचनक्रिया व्यवस्थित होते आणि अपचन, आम्लपित्त, बद्धकोष्ठतेची शक्यता कमी होते.

वजन कंट्रोलमध्ये राखण्यासाठी आहे फायदेशीर

शाकाहारी पदार्थांमध्ये जास्त फॅट्स नसतात. जास्त फॅट्सनसल्यामुळे वजन कंट्रोलमध्ये राखण्यासाठी शाकाहारी जेवण फायदेशीर ठरते. या उलट मांसाहार करणाऱ्यांना वजन वाढण्याची शक्यता जास्त असते.

काय आहेत तोटे?

शाकाहारी पदार्थ खाणे चांगलेच आहे. परंतु हा आहार योग्य पद्धती-ने घेतला पाहिजे. जर शाकाहार घेणाऱ्या लोकांनी योग्य आहार घेतला नाही तर त्यांना व्हिटॅमिन बी १२, ओमेगा ३, कॅल्शियम, प्रथिने अशा पोषक तत्वांची कमतरता भासू शकते. याची कमतरता झाल्यास कधीकधी आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. लक्षात घ्या, आहाराचा समतोल साधला तर शाकाहारी पदार्थांचे अनेक फायदे होतील. आजकालच्या फास्ट फूडचा ट्रेंडमध्ये खाण्याच्या सवयी खूप बिघडल्या आहेत. शाकाहारी लोकांसाठीही तेलकट पदार्थ आणि जंक फूडचे भरपूर पर्याय आहेत. हे पदार्थ शरीराला अजिबात फायदेशीर ठरत नाहीत. या उलट हे शरीराचे खूप नुकसान करतात. त्यामुळे तेलकट, फास्ट फूड आणि गोड पदार्थ खाणे टाळा.

आहारात 'या' गोष्टींचा समावेश करा

जर तुम्ही शाकाहारी असाल तर तुमच्या आहारात हिरव्या भाज्या, हंगामी फळे, दूध आणि इतर दुग्धजन्य पदार्थ, विविध प्रकारचे धान्य, सुका मेवा, नट, बिया अशा पदार्थांचा समावेश करा.

## मराठमोळ्या 'स्वरगंधर्व सुधीर फडके' चित्रपटाची ऑस्करसाठी निवडणाऱ्या यादीत समावेश

मुंबई -सुसुधीर फडके म्हणजेच आपल्या सर्वांचे लाडके बाबूजी. संगीत क्षेत्रातील हे एक अजरामर नाव आहे. बाबूजींचा संगीतमय प्रवास उलगडणारा 'स्वरगंधर्व सुधीर फडके' काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झाला. महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात या चित्रपटाला प्रेक्षकांनी पसंती दर्शवली. प्रेक्षकांसह श्रीधर फडके, आशा भोसले, माधुरी दीक्षित अशा अनेक दिग्गजांनी या चित्रपटाचे भरभरून कौतुक केले. विशेष म्हणजे अमेरिकेतही या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. तिथेही या चित्रपटाचे शोज हाऊसफुल्ल झाले. प्रेक्षकांचे एवढे प्रेम मिळवल्यानंतर आता हा चित्रपट फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून २९ चित्रपट या स्पर्धेसाठी विचारात घेतले आहेत. त्यात योगेश देशपांडे दिग्दर्शित 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या बहुचर्चित चित्रपटाचा समावेश आहे. ही नक्कीच कौतुकास्पद बाब आहे.




त्यामुळे आता म राठी चित्रपटसृष्टीत पुन्हा एकदा माना-चा तुरा रोवला जाण्याची शक्यता आहे. याबाबत दिग्दर्शक योगेश देशपांडे म्हणतात, ''ऑस्करसाठी भारताकडून पाठवल्या जाणाऱ्या या वर्षातील सर्वोत्तम २९ चित्रपटांच्या यादीत ''स्वरगंधर्व सुधीर फडके'' या चित्रपटाची निवड होणे, हे खूप अभिमानास्पद आहे. निर्माते, लेखक- दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ या सर्वांचे प्रामाणिक कष्ट यामागे असतात आणि त्यामुळे प्रत्येकाला हा क्षण आनंद देण-ारा ठरला. जगातील मोठा समजला जाणाऱ्या ऑस्कर पुरस्काराच्या यादीत आपल्या चित्रपटाचा शेवटच्या फेरीपर्यंत विचार केला जाणे, हे अतिशय मोठे समाधान देणारे आणि पुढील काम करण्यास अधिक ऊर्जा देणारे आहे.''

सौरभ गाडगीळ प्रस्तुत रिडिफाईन प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे सौरभ गाडगीळ आणि योगेश देशपांडे निर्माते आहेत. तर चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन योगेश देशपांडे यांचे आहे. 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या चित्रपटात सुनील बर्वे, मृण्मयी देशपांडे, सागर तळाशीकर, मिलिंद फाटक, आदिश वैद्य, सुखदा खांडकेकर, अपूर्वा मोडक, अविनाश नारकर, शरद पोंक्षे, उदय सबनीस, चिन्मय पटवर्धन, निखिल राऊत, विभावरी देशपांडे, धीरेश जोशी, परितोष प्रधान यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## प्रेमाच्या विशाल मिठीत बिलगली कपूर फॅमिली

मुंबई-अभिनेता रणबीर कपूर आज, २८ सप्टेंबर रोजी आपला वाढदिवस साजरा करत आहे. या खास दिवसाच्या निमित्तानं त्याची पत्नी, अभिनेत्री आलिया भट्टने सोशल मीडियावर त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या ८ कोटी फॉलोअर्सची मने जिंकणाऱ्या सुंदर कौटुंबिक क्षणांची मालिकाच तिने शेअर केली आहे.

आलिया भट्टने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या फोटोंपैकी एका फोटोमध्ये आलिया, तिचा पती रणबीर कपूर आणि त्यांची मुलगी राहा एका झाडाला मिठी मारताना त्यांच्या नात्यातील सुंदर क्षण दाखवताना दिसते. या फोटो पोस्टच्या कॅप्शनमध्ये तिनं लिहिलं आहे की, ''कधीकधी तुम्हाला फक्त एका मोठ्या मिठीची गरज असते.. आणि तुम्ही आयुष्य एकसारखे अनुभवता,'' त्यानंतर रणबीरला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना तिनं ''हॅपी बर्थडे बेबी,'' असं लिहिलंय.ग्रे कलरचा ब्लेझर आणि हलकी जीन्स घात-लेली आलिया एका हातानं झाडाला धरून रणबीरवरील प्रेम व्यक्त करताना दिसतेय. या फोटोमध्ये रणबीर कपूर कॅज्युअल, ड्रेसमध्ये अतिशय शांत दिसत आहे. त्यांची मुलगी राहा आता एक वर्षाची झाली आहे. तिनंही गुलाबी पँटसह पांढरा स्वेटशर्ट परिधान करून, प्रेमाच्या या कौटुंबिक मिठीत स्वत:ला सामील करत या फोटोलाही अर्थपूर्ण बनवलं आहे.आलियानं पोस्ट केलेल्या इतर फोटोमध्ये त्यांच्या नात्यातील गोड क्षण कॅप्चर झाले आहेत. आजवर दोघांनीही आपल्या मुलीला प्रसिध्दीच्या स्पॉटलाइटपासून दूर ठेवले आहे. फॅन्स आणि सेलिब्रिटींनी या पोस्टवर अनेक प्रेमळ शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. अभिनेता अर्जुन कपूरने आपल्या कमेंटमध्ये लिहिलंय, ''विजयासाठीचा दुसरा फोटो.'' चित्रपट निर्माते गुनीत मोंगा कपूर यांनी लिहिलंय, ''वाढदिवसाच्या शुभेच्छा.''

कामाच्या आघाडीवर बोलायचं झालं तर, आलिया आणि रणबीर दोघांचेही अनेक रंजक प्रोजेक्ट सुरू आहेत. आलिया भट्ट आगामी 'अल्फा'मध्ये शर्वरी वाघ हिच्याबरोबर दिसणार आहे, हा चित्रपट खूप अपेक्षा निर्माण करणारा आहे. दुसरीकडे, रणबीर, संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाच्या रिलीजसाठीची तयारी करत आहे. यामध्ये तो आलिया आणि विकी कौशल यांच्याबरोबर काम करत आहे. दोन्ही कलाकार यशस्वी करिअर आणि कौटुंबिक जीवनाचा समतोल साधत, पडद्यावर आणि बाहेरही प्रेक्षकांना आपलंसं करत आहेत.

## गोष्ट एका लक्ष्मीची

एक होती मुलगी. तिचे नाव लक्ष्मी. दहा-बारा वर्षांची एक चुणच-ुणीत मुलगी. रंगाने थोडीशी सावळी पण नाकी-डोळी नीटशी! चेहऱ्यावर आत्मविश्वासाचे तेज झळकायचे तिच्या. लक्ष्मी शाळेत जायची. शाळा सुटल्यावर आईला भाजी विकायला मदत करायची. लक्ष्मीची आई चौकात रस्त्याच्या कडेला दिवसभर बसायची. भाजी विकून चार पैसे कमावत होती. लक्ष्मीचे बाबा कधीच देवाघरी गेले होते. त्यामुळे तीन मुलांची जबाबदारी तिच्या आईनेच उचलली होती. तीन भावंडात लक्ष्मी सर्वात मोठी. लक्ष्मीच्या आईला शिक्षणाचे महत्त्व समजले होते. त्यामुळे तिने आपल्या तीनही मुलांना शाळेत घातले होते. पण शाळेचा खर्च भागवता भागवता लक्ष्मीच्या आईच्या नाकीनऊ येत असत.ही ओढाताण लक्ष्मीला कळायची. पण लक्ष्मी होती अवघी बारा-तेरा वर्षांची. सातवी-आठवी शिकणारी. शाळा सोडून आ-पणही भाजी विकण्याचा धंदा करावा असे तिला वाटायचे. तिने कित्येक वेळा आईला म्हटलेसुद्धा. पण शाळा सोडण्याचा विचार आईला अजिबात पसंत नव्हता. रविवारी सकाळी १० वाजता लक्ष्मी स्वतःच भाजी घेऊन बसली होती. समोर भलामोठा रस्ता. फुटपाथवर लोकांची ये-जा सुरू होती. काही लोक लक्ष्मीकडून भाजी घ्यायचे. पण बराच वेळ गिऱ्हाईक आले नाही म्हणून लक्ष्मी बैचेन झाली होती. कारण ऊन वाढू लागल्यावर भाजी लवकर सुकून जाईल याची तिला भीती वाटत होती. इतक्यात एक लहान मूल आई-बाबांचा डोळा चुकवून रस्त्यावरून पलीकडे जाण्यासाठी धावू लागले. खरं तर गाड्या खूप वेगाने धावत होत्या. इतक्यात एक गाडी वेगाने आली. आता ते बाळ गाडीखाली येणार हे दिसताच, क्षणाचाही विचार न करता लक्ष्मी धावली आणि त्या मुलाला एका झटक्यात तिने बाजूला केले.या धा-



वपळीत लक्ष्मी थोडी धडपडली. पण तिने मुलाला वाचवलेच! गाडीच्या ब्रेकचा कर्णकर्कश आवाज झाला. पण ड्रायव्हरचा गाडीवरचा ताबा सुटला आणि गाडी रस्त्याच्या मधल्या खांबाला धडकली. दहा-बारा माणसे धावली. त्यांनी त्या मुलाला आणि लक्ष्मीला सावरले अन् फुटपाथवर त्या दोघांना आणून बसवले. प्रत्येकजण लक्ष्मीचे कौतुक करू लागला. मोठे प्रसंगावधान दाखवत लक्ष्मीने त्या मुलाचे प्राण वाचवले होते. मुला-चे आई-बाबाही लक्ष्मीजवळ आले. त्यांनी घडला प्रसंग स्वतःच्या डोळ्यांनी बघितला होता. पण त्यावेळी जागेवर उभे राहून ओरडण्या रडण्यापलीकडे त्यांना काही करता आले नव्हते. पण क्षणार्धात निर्णय घेऊन मोठे प्रसंगावधान दाखवत लक्ष्मीने त्या मुलाचे प्राण वा-चवले होते. त्यांनी लक्ष्मीचे खूप आभार मानले आणि तिला १० हजार रुपये देऊ केले.


पण लक्ष्मी म्हणाली, काका मला पैसे नकोत. मी माझे कर्तव्यच केले. त्याच्याएवढाच मला छोटा भाऊदेखील आहे. भावासाठीच मी माझे प्राण धोक्यात घातले. हे ऐकून त्या मुलाच्या आई-बाबांच्या डोळ्यांत पाणी आले. ते म्हणाले, तू एवढा मोठा पराक्रम केलास, तुला बक्षीस घ्यावेच लागेल. आता मात्र नाईलाजाने लक्ष्मी म्हणाली, काका माझ्या शाळेचा खर्च कराल. लक्ष्मीचे उत्तर ऐकून मुलाचे आई-बाबा अवाक् झाले.

लक्ष्मीची शिकण्याची आवड बघून एका क्षणात त्यांनी

हो म्हटले.लक्ष्मी तुझ्या शिक्षणाची जबाबदारी आजपासून आम्ही घेत आहोत, असे त्या मुलाच्या बाबांनी म्हणताच लक्ष्मीचे डोळे भरून आले. मोठ्या कृतज्ञतेने त्यांच्याकडे बघत लक्ष्मी आपले पाण्याने भरलेले डोळे पुसू लागली. तोच त्या लहान मुलाने लक्ष्मीला ताई ताई म्हणत गच्च मिठी मारली. मग ते दृश्य पाहून साऱ्यांच्याच डोळ्यांत पाणी तराळले.

**-कथा - रमेश तांबे**

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्ल्वीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# सौ. उषा कांबळे यांना उमेदवारी दिल्यास विजय निश्चित - मारुती पांडे

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाची तुलनात्मक ताकद पाहिल्यास सर्वात प्रभावी पक्ष म्हणून काँग्रेस पक्षच आहे. आणि या पक्षाच्या वतीने जर उदगीरच्या माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस सौ. उषा कांबळे यांना उमेदवारी दिल्यास निश्चितपणे विजय खेचून आणू शकतात असा विश्वास प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना काँग्रेस पक्षाचे जळकोट तालुकाध्यक्ष मारुतीराव पांडे यांनी व्यक्त केला.

काँग्रेस पक्षाचे नेते माजी पालकमंत्री आ. अमित भैय्या देशमुख यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडे राहावा, यासाठी आग्रही भूमिका घेतली आहे. त्यामुळेच उत्स्फूर्तपणे मतदारसंघातील काँग्रेसचे नेते व कार्यकर्ते कामाला लागले आहेत. उदगीरच्या माजी नगराध्यक्ष उच्चविद्याविभूषित, विकासाची दृष्टी असलेल्या नेत्या सध्या मतदारसंघात गाठीभेटी करत असून जनतेतून त्यांना मोठा प्रतिसाद मिळताना दिसून येतो आहे. इतकेच नाही तर ज्या पद्धतीने त्यांनी उदगीर च्या नगराध्यक्ष असताना उदगीर शहराचा विकास केला, सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या हिताचा विचार केला, तशाच पद्धतीने मतदार संघात विकास व्हावा. अशी अपेक्षा व्यक्त करत मतदारच त्यांना उमेदवार म्हणून पसंती देत आहेत. तसेच तुम्ही निवडणुकीला थांबा, आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे आहोत. अशा पद्धतीचा विश्वास देत आहेत. एका अर्थाने नागरिकांचीच पसंद काँग्रेसच्या उमेदवाराची असल्यामुळे विजयश्री काँग्रेसलाच मिळू शकेल. कारण सन २००१ मध्ये जनतेतून निवडून आलेल्या नगराध्यक्षा म्हणून त्यांनी केलेले कार्य आजही लोकांच्या नजरेत आहे. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान आपल्या सर्व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह त्यांनी केलेले प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय आहेत. त्यांच्या प्रयत्नामुळे उदगीर शहरात लोकसभेला साडेसात हजाराहून अधिक मताधिक्य प्राप्त झाले होते. नगरपालिकेमध्ये अत्यंत दर्जेदार काम करून त्यांनी शहराचा तर विकास केलाच केला, नगरपालिकेला अ दर्जा प्राप्त करून दिला. विकासाला प्राधान्य देणाऱ्या नेत्या म्हणून त्यांच्याकडे जनता पाहतेय. तसेच गोरगरिबांचे प्रश्न सोडवण्यासाठी देखील त्या सतत अग्रेसर असतात.

स्थानिकचा आमदार हवा, अशा पद्धतीची चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे. सध्या फक्त गुत्तेदारांचा आणि पुढार्यांचा विकास झाला आहे. सर्वसामान्य जनता आहे तिथेच आहे. अशा पद्धतीची चर्चा मतदारसंघात दिसून येत आहे. त्यामुळे आपल्या परिसरातील आपल्या हक्काचा आमदार हवा, तर मग उषाताईला उमेदवारी मिळावी. यासाठी सर्व काँग्रेसचे नेते व कार्यकर्ते आणि मित्र पक्षातील कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे प्रयत्न करत असल्याचेही मारुती पांडे यांनी सांगितले. उदगीर, जळकोटची जनता इतिहास घडवणार म्हणजे घडवणारच, अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेच्या उषाताई कांबळे यांच्याकडे विकासाचे नियोजन असते, तसेच सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व त्यांनी यापूर्वी केलेले आहे, आणखीन करू शकतील, अशी क्षमता त्यांच्यामध्ये आहे. समाजासाठी सतत झटणाऱ्या परिवारातील बाई लेक म्हणून मतदार संघात त्यांचा चाहता वर्ग मोठा आहे. त्यांच्या वडिलांनी स्वखर्चाने बौद्ध विहार बांधून समाज बांधवांसाठी आपली पाच एकर जमीन या बौद्ध विहारासाठी दान दिली आहे. हा दानशूरपणा आणि समाजाबद्दलची तळमळ विचारात घेऊन त्यांना उमेदवारी मिळाल्यास त्या निश्चित विजय होतील. असा विश्वासही याप्रसंगी मारुतीराव पांडे यांनी व्यक्त केला आहे.

# तिसरी परिवर्तन आघाडीच उदगीर विधान सभेचा आमदार ठरवणार,

**उदगीर (प्रतिनिधी)** येणारा काळ हा राजकीय घडामोडीचा एक ऐतिहासिक ठरणार आहे. त्याच विचारावर, उदगीरमध्ये तिसऱ्या परिवर्तन आघाडीची मिशन विधान सभा निवडणूक २०२४ ही डोळ्यासमोर ठेऊन २८८ जागा लढवणार आहे. २८ पक्ष १२ प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या सहभागातून महाराष्ट्रामध्ये ही तिसरी आघाडी झंझावती दौरा करीत आहे या तिसऱ्या आघाडीचे प्रमुख अंकुश शिवाजीराव पाटील, राष्ट्रीय मराठा पार्टी संस्थापक, अध्यक्ष व तिसऱ्या आघाडीचे प्रमुख असून आज दि.०२ ऑक्टोंबर २०२४ रोजी उदगीर येथे. शासकीय विश्रामगृह उदगीर येथे बैठक संपन्न झाली या बैठकीचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र भांगे, राष्ट्रीय मराठा पार्टी महाराष्ट्र उपाध्यक्ष व अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा लातूर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये असे ठरले की उदगीर विधानसभेच्या रणधुमाळीची विशेष चर्चा झाली यात कांही मुद्दे घेवून येणार. आमदार कसा असावा, त्याचे कार्य कसे असावे, लोकनेत्यांची गरज कोणती असावी यात शेती, शेतमजूर, बिगारी सुशिक्षीत बेकार इतर प्रकल्प उदगीरमध्ये दूध डेरी चालू झाली पाहिजे, शासकीय बँका लोण नाकारणे, आरोग्य केंद्र गलथान कारभार, कॉलीटिक कंट्रोल नसलेली कन्ट्रक्शनचे काम, आपत्ती कालीन व्यवस्थापन उदगीरच्या रहदारीचा प्रश्न. रात्री बेरात्री उदगीरमध्ये फिरणे मुष्कील झाले आहे, तसेच चोरट्यांचा धुमाकुळ, मटका सुपर लॅटरी, रम्मी, तिरट, अंगणवाडीचा खाऊ शाळेच्या खिचडीत निकृष्टपणा, राशनचा गहू तांदळाचा काळा बाजार, दारूचे आड्डे, ताडीचा बोगस व्यवसाय असे एक ना अनेक प्रश्नावर चर्चा झाली व बैठकीला तिसऱ्या परिवर्तन आघाडीचे प्रमुख राष्ट्रीय मराठा पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अंकुशराव शिवाजीराव पाटील असे म्हणाले की राष्ट्रीय कॉंग्रेस व भाजपा,राष्ट्रवादी कॉंग्रेस हे एक नाण्याच्या दोन बाजू आहेत मी कालच आई जगदंबा तुळजा भवानीचे दर्शन व आशीर्वाद घेऊन. छत्रपती शिवरायांचे राज्य या महाराष्ट्रात आले पाहिजे ही शपथ घेतली तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र भांगे व रा.स.पार्टी महाराष्ट्र उपाध्यक्ष व अ.भा.म. महासंघ जिल्हाध्यक्ष लातूर यांनी उदगीर विधानसभा ही तिसरी परिवर्तन आघाडीचेचे आमदार होणार हि आमची खुन्नस आहे जनतेला व मतदारांना माहीती आहे की आमची संघटना ही काम करणारी संघटना आहे. आम्ही राजे छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती शाहू महाराज, फुले, आंबेडकरांच्या विचारांवर चालणारी ही आमची तिसरी आघाडी आहे. मुख्य पाहूण्याचे आभार अविनाश देवकत्ते यांनी प्रमुख पाहूण्याचे आभार व्यक्त केले तसेच या बैठकीला उपस्थित प्रमुख अंकुशरावाशिवाजीराव पाटील, परिवर्तन तिसरी आघाडी प्रमुख व ॲड. गवळी सर, श्रीमती लोकरेताई धाराशिव, जिल्हाध्यक्षा-श्रमती वनमाला मिस्त्री, आखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष लातूर व रा.म. पार्टीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ.रामचंद्र भांगे, दादासाहेब माने-तुळजापुर ता.अध्यक्ष, प्रसिध्दी प्रमुख रामनवल शर्मा, समशेर खान गोलंदाज, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी शिंदे,देविदास चिखले उदगीर तालुकाध्यक्ष, घासी चॉदसाब, मराठा समाजासाठी अमरण उपोषणकर्ते रामभाऊ रावणगावे यांचे सर्वांनी मिळून शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. इत्यादी जन उपस्थित होते.

# अतनूरात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी



**अतनुर (प्रतिनिधी)** राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती अतनूर परिसरात उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी अतनूर , गव्हाण , चिंचोली , मवापूर , गुत्ती ग्राम पंचायत कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सामाजिक युवानेते यादवराव विनायक केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून अतनूरचे युवानेते सरपंच चंद्रशेखर पाटील, उपसरपंच बाबूराव कापसे, ग्रामसेवक फिरोज शेख , तलाठी अतिक शेख, शिवसेनेचे जिल्हासरचिटणीस विकास सोमुसे-पाटील , ग्राहक संरक्षण परिषदेचे शासननियुक्त अशासकीय सदस्य बी.जी. शिंदे अतनूरकर , गव्हाणचे सरपंच बालाजी गुडसुरे, ग्रामसेवक विजय भोसले , मवापूरच्या सरपंच सौ. कोमल तुळशीदास पाटील. सामाजिक कार्यकर्ते तुळशीदास पाटील , अमोल गायकवाड , चिंचोलीच्या सरपंच सौ.रेखा बिरादार , उपसरपंच राजेंद्र बंडरे , माजी सरपंच संतोष बट्टेवाड , दतात्रेय गिरी , बंडरे , , बिरादार , गव्हाणे , पाटील , शाम हुंजे , पोलीस पाटील बाबू बेळकुंदे , माजी सैनिक आयुबसाब मुंजेवार , प्रमोद संगेवार , चंद्रकांत गायकवाड, गुंडु बोडेवार, किशन बारसुळे , खंडु गायकवाड हे उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, सत्य आहे अहिंसा हे दोन शब्द उच्चारताच आपल्याला महात्मा गांधी यांची आठवण येते. जय जवान जय किसान हा नारा लालबहादूर शास्त्री यांनी दिला. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांनी भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अहिंसात्मक मार्गाचा अवलंब केला आणि भारत मातेला स्वातंत्र्य मिळवून दिले.

अध्यक्षियसमारोपात युवानेते यादव केंद्रे व सरपंच चंद्रशेखर पाटील म्हणाले, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांना वाचन करावे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.जी. अतनूरकर यांनी केले तर आभार कैलास पाटील यांनी मानले. यावेळी सर्वच कर्मचारी उपस्थित होते.

# प्रकाश वनशेट्टे यांचा गणित विषयाचा शैक्षणिक व्हिडीओ जिल्ह्यात तृतीय

**जळकोट (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने डिसेंबर २०२३ मध्ये शिक्षकांसाठी ङ्क शैक्षणिक उपक्रम व्हिडीओ निर्मिती स्पर्धाङ्क आयोजित केलेली होती. या स्पर्धेत माळहिप्परगा येथील धोंडूतात्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गणित विषयाचे उपक्रमशील शिक्षक प्रकाश शिवलिंगराव वनशेट्टे यांनी निर्माण केलेला गणित विषयाचा व्हिडीओ लातूर जिल्हयातून तृतीय तर जळकोट तालुक्यातून प्रथम आलेला आहे.



या स्पर्धेसाठी विशेष परिश्रमपूर्वक सहभाग घेवून शाळेचे नाव लौकिक केल्याबद्दल संस्थेचे सचिव, मार्गदर्शक बी. एम. जाधव, मुख्याध्यापक तथा प्राचार्य एच. व्ही. सूर्यवंशी, पर्यवेक्षक आर.डी. वाकळे, प्रा.डी.एन. हंडरगुळीकर, प्रा.पी.आर. फुलमंटे, प्रा.एल.एम. कोतवाडे, प्रा.एस.व्ही. जाधव, प्रा.के.डी. बोप्पा वाड, प्रा.पी.बी. जाधव, बी.एम. मालुसरे, डी. एच.कदम, व्ही.टी. केंद्रे, आर.एन. भोसले, डी.व्ही. गबाळे, एम.ए. सिरसाट, एम.एस. घाटे, डी.पी. मद्रे आदींनी अभिनंदन केले.

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय

(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२४/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार केंद्रे मिरा हणमंत वय २५ वर्षे रा. एकुर्का खु. ता.जळकोट जि.लातूर यांचा जन्म मौजे एकुर्का खु. ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. ०९/०६/१९९८ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार केंद्रे मिरा हणमंत यांचा दिनांक ०९/०६/१९९८ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी केंद्रे मिरा हणमंत यांचा जन्म दिनांक ०९/०६/१९९८ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु केंद्रे मिरा हणमंत यांचा जन्म दिनांक ०९/०६/१९९८ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय एकुर्का खु. ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २४/०९/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २५/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७७८/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Ambubai W/o Vasant Shastri, R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक २०.०४.२००६ रोजी Udgir Tq.udgir Dist.Latur मयत झाले आहेत व अर्जदार

1. Sanjay Vasantrao Shastri, Age 50 yrs, Occu. Agri,
2. Sharad Vasantrao Shastri, Age-53 yrs, Occu. Agri
3. Mangala Vasantrao Shastri, Age-69 yrs, Occu Nil
4. Smt Lakshmibai W/o Sureshrao Shastri, Age- 47 yrs, Occu. H.H.
5. Sangmeshwar S/o Suresh Shastri, Age 27 yrs, Occu. Education
6. Smt Sandhya W/o Rameshrao Shastri, Age 71 yrs, Occu. H.H.
7. Gajanan S/o Rameshrao Shastri, Age- 24 yrs, Occu. Education

All R/o Mukkawar Galli, Choubara Road, Udgir Tq. Udgir Dist. Latur यांनी खालील नमुद ७ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Sanjay Vasantrao Shastri | 50 | Son |
| 2. | Sharad Vasantrao Shastri | 53 | Son |
| 3. | Mangala Vasantrao Shastri | 69 | Daughter |
| 4. | Smt Lakshmibai W/o Sureshrao Shastri | 47 | Daughter in law |
| 5. | Sangmeshwar S/o Suresh Shastri | 27 | Grand Son |
| 6. | Smt Sandhya W/o Rameshrao Shastri | 71 | Daughter in law |
| 7. | Gajanan S/o Rameshrao Shastri | 24 | Grand son |

अर्जदार याने Ambubai W/o Vasant Shastri या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Ambubai W/o Vasant Shastri याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०८/११/२०२४

के.डी. सुर्यवंशी
कनिष्ठ लिपीक
२ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुतराळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर


उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो










उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशरे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

# एकात्मतेतून स्वच्छता संस्कार पाझरले जातात :प्रा.बी.व्ही.मोतीपवळे

लातूर / प्रतिनिधी- स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या ब्रीद वाक्यास अनुसरुन कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या पुढाकाराने आणि राष्ट्रीय सेवा योजना व जिमखाना यांच्या संयुक्त विद्यमाने, महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, मार्गदर्शक व प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक विचारवंत प्रा.बी.व्ही.मोतीपवळे तर डॉ. दिनेशसिंह चौहान, डॉ. ज्योती देशमुख, डॉ.अच्युत भरोसे, डॉ.अनिलकुमार कांबळे, डॉ.रमेश ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.







प्रा. मोतीपवळे मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की कृषि महाविद्यालय परिसर हा स्वच्छ, सुंदर, हरित व सुरक्षित आहे. कृषिच्या विद्यार्थ्यांनी एकता, एकात्मता याद्वारे स्वभाव स्वच्छता व संस्कार स्वच्छता अंगीकारावी आणि इतरांप्रति सामाजिक बांधीलकीचा भाव ठेवावा. पुढे ते असेही म्हणाले की या कृषि महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन व विस्तार कार्यातून या भागातील शेतकरी-पशुपालक स्वावलंबी होण्यास मदत होत आहे.

अ ध्य क्ष ी य समालोचनात अधिष्ठाता डॉ. ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक, व्यक्तिगत, वैचारिक व पर्यावरणीय स्वच्छतेचा अवलंब करावा असे आवाहन केले. चांगल्या सवयी व गुणांमुळे संस्कारक्षमता वृध्दी होते. त्यातूनच नैतिक मुल्ये संवर्धित केले जातात. साधेपणा व विनम्रता हे संस्कार मजबूत करण्यासाठी महत्वाचे घटक आहेत.

एकात्मतेतून स्वच्छता संस्कार पाझरले जातात प्रा.बी. व्ही.मोतीपवळे स्वभाव व संस्कार स्वच्छता नैतिक मुल्यांची जननी डॉ.बाबासाहेब ठोंबरे स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या ब्रीद वाक्यास अनुसरुन कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या पुढाकाराने आणि राष्ट्रीय सेवा योजना व जिमखाना यांच्या संयुक्त विद्यमाने, महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, मार्गदर्शक व प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक विचारवंत प्रा.बी.व्ही.मोतीपवळे तर डॉ. दिनेशसिंह चौहान, डॉ. ज्योती देशमुख, डॉ.अच्युत भरोसे, डॉ.अनिलकुमार कांबळे, डॉ.रमेश ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. मोतीपवळे मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की कृषि महाविद्यालय परिसर हा स्वच्छ, सुंदर, हरित व सुरक्षित आहे. कृषिच्या विद्यार्थ्यांनी एकता, एकात्मता याद्वारे स्वभाव स्वच्छता व संस्कार स्वच्छता अंगीकारावी आणि इतरांप्रति सामाजिक बांधीलकीचा भाव ठेवावा. पुढे ते असेही म्हणाले की या कृषि महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन व विस्तार कार्यातून या भागातील शेतकरी-पशुपालक स्वावलंबी होण्यास मदत होत आहे. अध्यक्षीय समालोचनात अधिष्ठाता डॉ. ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक, व्यक्तिगत, वैचारिक व पर्यावरणीय स्वच्छतेचा अवलंब करावा असे आवाहन केले. चांगल्या सवयी व गुणांमुळे संस्कारक्षमता वृध्दी होते. त्यातूनच नैतिक मुल्ये संवर्धित केले जातात. साधेपणा व विनम्रता हे संस्कार मजबूत करण्यासाठी महत्वाचे घटक आहेत. या स्वच्छता अभियानामध्ये लातूर शहरातील विवेकानंद चौक ते गरुड चौक तसेच विवेकानंद चौक पोलीस चौकी या परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेचा संदेश दिला. त्याचबरोबर कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील एकूण आठशे विद्यार्थ्यांनी प्लॅस्टीक मुक्ती, गाजर गवत निर्मुलन करुन परिसर कचरामुक्त केला. कार्यक्रमात शिवकुमार तांदळे, सानिया शेख व श्रावणी नवले या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.दिनेशसिंह चौहान, सूत्रसंचालन डॉ.दयानंद मोरे तर आभार डॉ.अनिलकुमार कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. व्यंकट जगताप, डॉ. संतोष कांबळे, डॉ.अनंत शिंदे, डॉ.भास्कर आगलावे, डॉ. विजय भामरे, डॉ.राजेश शेळके, डॉ. पद्माकर वाडीकर,डॉ.नितीन तांबोळी, डॉ. विनोद शिंदे, डॉ. सुनिता मगर, डॉ.प्रभाकर अडसूळ, डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ.महेश दुधारे, डॉ.योगेश भगत, डॉ.राहुल चव्हाण, डॉ. विद्या हिंगे, डॉ. दिप्ती वानखेडे, डॉ.संघर्ष श्रृंगारे, डॉ. अजित पुरी, सुधीर सुर्यवंशी, सुधीर सदार, प्रकाश कांबळे, सुरेखा आंबटवाड व श्रीमती. मीना साठे यांनी परिश्रम घेतले.

**CHANGE OF NAME**

I have changed my name from 1) SIDDIQUI NEEDA ARIF. 2) SIDDIQUI NIDA AREFSAB to SHAIKH NIDA SHOYEB MAHMAD Hence for this declaration. And in future I will use my new name SHAIKH NIDA SHOYEB MAHMAD Also, in future the same name will be used by my family.

**OLD NAME**
1) SIDDIQUI NEEDA ARIF
2) SIDDIQUI NIDA AREFSAB
**NEW NAME**
SHAIKH NIDA SHOYEB MAHMAD
**ADDRESS**
AZAM CHOWK, LABOUR COLONY,
LATUR,413512, MAHARASHTRA, INDIA.

## उमेद महिला कर्मचारी जिल्हा संघटना ३ पासून काम बंद करणार असल्याचे प्रशासनाला दिले निवेदन




लातूर : प्रतिनिधी - ग्रामविकास व पंचायत राज विभागा अंतर्गत राबविण्यात येत आलेल्या उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा, तालुका स्तरावरील कार्यरत कर्मचारी तसेच समुदाय संसाधन महिला यांच्या प्रलंबित मागण्यासाठी संघटनेच्या वतीने शासनाकडे नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे.

उमेद अभियानातील सर्व कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्याची शासनाने दखल घ्यावी, यासाठी राज्य संघटनेकडून गावस्तरापासून ते जिल्हा स्तरापर्यंत आंदोलनाबाबत चा कृती कार्यक्रम ठरविण्यात आला असून त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ पासून लातूर जिल्ह्यातील सर्व कर्मचारी काम बंद करणार असले बाबतचे निवेदन तालुका व जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्यात आले असल्याचे लातूर जिल्हा उमेद महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे. तसेच या काम बंद आंदोलनात जिल्ह्यातील सर्व कर्मचारी यांनी सहभाग घेऊन काम बंद आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन जिल्हा संघटना अध्यक्ष व सर्व पदाधिकारी याच्या वतीने करण्यात येत आहे.



महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते श्री हरिभाऊ बागडे (नाना) यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्यानंतर काल छत्रपती संभाजीनगर येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन उदगीर येथील समाजीक कार्यकर्ते श्री. कुणाल बागबंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले व मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी जुन्या आठवणीना उजाला दिल्या. याप्रसंगी श्री. प्रवीण सरदेशमुख व इतर उपस्थित होते.

## विश्वनाथ शेरे यांचे निधन



येरोळ : आटोळा ता.चाकुर येथील जेष्ट नागरिक विश्‍वनाथ नरसिंग शेरे वय ८५ यांचे वृध्दपकाळाने बुधवारी सांयकाळी साडे चार वाजता निधन झाले. त्यांच्या पश्र्चात पत्नी, तीन विवाहीत मुले, सुना नातवंडे पंतवंडे असा मोठा परिवार असुन त्यांच्या पार्थिवावर आटोळा येथील विरशैव लिंगायत स्माशानभुमीमध्ये गुरुवारी सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. आटोळा येथील प्रगतशिल द्राक्ष उत्पादक शेतकरी परमेश्र्वर शेरे यांचे ते वडील तर जि.प.चे सहशिक्षक बालाजी शेरे यांचे चुलते होत.

### जाहीरनामा

**रेणापूर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापूर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

किरकोळ दि. अर्ज क. २६४/२०२४
रेखा व ईतर-४/
निरंक निशाणी क

**वारसाचे प्रमाणपत्राबाबत**

ज्यापेक्षा राजकुमार भानुदास मुंढे हे राहणार मौजे कोष्टगाव ता रेणापूर जि. लातूर येथे मृत्यू झालेला आहे. ०६/०८/२०२४ रोजी किंवा त्या सुमारास मौजे कोष्टगाव ता. रेणापूर जि. लातूर येथे मृत्यू झालेला आहे. येथे मयत झाले आणि पुढील अर्जदारानी हया कोटांस सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार ०१. रेखा राजकुमार मुंढे वय ५५ वर्षे धंदा. घरकाम ०२. रामेश्र्वर राजकुमार मुंढे वय- ३० वर्षे धंदा, शेती ०३. परमेश्र्वर राजकुमार मुंढे वय-२८वर्षे धंदा. शेती सर्व रा. कोष्ठगाव ता. रेणापूर जि. लातूर. ०४. सुप्रिया विठ्ठल केंद्रे वय-३५ वर्षे धंदा-घरकाम रा. माळहिप्परगा ता. जळकोट जि. लातूर. ०५. धनश्री पंकज केंद्रे वय-३२ वर्षे धंदा. घरकाम, रा. रुध्दा ता. अहमदपूर जि. लातूर. यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यावे तारखेपासून एक महिन्याचे आआंत त्याने हत्या कोटांच हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत राजकुमार भानुदास मुंढे वारस प्रमाणपत्र देईल. पुढील तारीखः ०८.११.२०२४
आज रोजी तारीख २५ माहे ०९ सन २०२४

**क. लिपिक**
**सह दि.न्या.**
**क. स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापुर**

### पान १ वरून

**इराणने...**

त्यासोबतच स्थिती शांत करण्यासाठी आणि याला पूर्ण युद्धात रूपांतरित होण्यापासून रोखण्यासाठी मदत करू इच्छितो. अमेरिकाने मोठ्या युद्धाच्या शंकेमुळे तेहरानच्या हल्ल्याविरुद्ध प्रत्युत्तर कारवाई करण्याचे वचन दिले आहे.

**पंतप्रधानांकडून...**

यासोबतच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन केले.

**बनावट सुप्रीम...**

कायद्यांचा धाक दाखवून ओसवाल यांच्याकडून कोट्यवधी रुपये वसूल केले.

बँक कर्मचारी सामील?

दोघांच्या बँक खात्यात ७ कोटी रुपये ट्रान्सफर करण्यात आले होते. त्यापैकी ४ कोटी रुपये अतनू याच्या, तर ३ कोटी रुपये आनंद याच्या खात्यात जमा झाले होते. या प्रकरणात आसाममधील बँकेचे कर्मचारीही सामील असण्याचा संशय पोलिसांना आहे.

**जयप्रकाश...**

जयप्रकाश दगडे यांचा हा पुरस्कार देऊन परिषदे दरम्यान विशेष सन्मान करण्यात येत असल्याचेही प्रा. डॉ.कराड आणि डॉ. विजय भटकर यांनी या संदर्भात प्रसृत केलेल्या पत्रात नमूद केले आहे. विशेष बाब म्हणजे, या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्याआधी जगातील सर्व धर्मांचे प्रतिनिधी आपल्या धर्मग्रंथांसह विश्वशांती दिंडीत सहभागी होऊन , आपापल्या धर्मातील विश्वशांती व मानवकल्याणाचा दिव्य संदेश देणार आहेत. या वर्ल्ड पार्लमेंटच्या व्यासपीठावरुन संपूर्ण जगाला शांतता आणि मानवकल्याणाचा संदेश देण्यासाठी जगभरातील विविध धर्मांचे प्रमुख, शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, विचारवंत उपस्थित राहणार आहेत.

**देशात...**

आंतरराष्ट्रीय पातळीवर होणार असून मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. बुधवारी एकाच दिवसात कच्च्या तेलाच्या किमतीत ५ टक्क्यांची वाढ झाल्याने तसे संकेत मिळत आहेत. इराण हा कच्च्या तेलाचा जगातील एक प्रमुख निर्यातदार देश आहे. भारतामध्ये आयात करण्यात येणा-या कच्च्या तेलामध्ये इराणचा वाटा मोठा आहे.

इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरूतवर पुन्हा एकदा जोरदार मारा केला. त्यामुळे इस्रायल-लेबनॉन-इराण हा संघर्ष थांबण्याचे नाव घेत नाही. याचा मोठा आर्थिक परिणाम जगाला भोगावा लागणार आहे. पेट्रोलियमचे दर ५ टक्क्यांहून अधिक कडाडले आहेत.

**रेणापूर...**

माजी उपसभापती अनंत चव्हाण यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

**प्रधानमंत्री...**

गटार योजनेसाठी अमृत २.० अभियान अंतर्गत ३०५ कोटी १९ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. लातूर शहरातील भूमिगत गटार योजनेतून शहरातील सांडपाण्याचे योग्य नियोजन करून, तसेच कव्हा येथे ५३ एमएलडी एसटीपी प्रकल्प उभारून सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचेही भूमिपूजन

औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी अमृत २.० अभियान अंतर्गत ४३ कोटी ४ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आज या योजनेचे भूमिपूजन केले. यानिमित्त औसा येथे आयोजित कार्यक्रमाला आमदार अभिमन्यू पवार, औसा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या योजनेतून याकतपूर रोड येथे नवीन जलकुंभ उभारणी, शहराच्या वाढीव हद्दीतील व जुन्या शहरात कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या भागातील वितरण व्यवस्था बदलणे, जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे, शहरातील ८० किलोमीटर वितरण व्यवस्थेचे काम केले जाणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पुरेशा दाबाने व नियमित पाणीपुरवठा होणार आहे.

## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**DECLARATION**
**CHANGE OF NAME**

I have changed my name from 1) SHAIKH SHOYEB MAHMAD ABDUL ROUF 2) SHAIKH SHOYEBMAHMAD ABDULROUF to SHAIKH SHOYEB MAHMAD ABDUL RAUF. Hence for this declaration. And in future I will use my new name SHAIKH SHOYEB MAHMAD ABDUL RAUF. Also, in future the same name will be used by my family.

**OLD NAME**
1) SHAIKH SHOYEB MAHMAD ABDUL ROUF
2) SHAIKH SHOYEBMAHMAD ABDULROUF
**NEW NAME**
SHAIKH SHOYEB MAHMAD ABDUL RAUF
**ADDRESS**
AZAM CHOWK, LABOUR COLONY,
LATUR,413512, MAHARASHTRA, INDIA.

**DECLARATION CHANGE OF NAME**

I have changed my name from 1) SIDDIQUI NEEDA ARIF. 2) SIDDIQUI NIDA AREFSAB to SHAIKH NIDA SHOYEB MAHMAD Hence for this declaration. And in future I will use my new name SHAIKH NIDA SHOYEB MAHMAD Also, in future the same name will be used by my family.

**OLD NAME**
1) SIDDIQUI NEEDA ARIF
2) SIDDIQUI NIDA AREFSAB
**NEW NAME**
SHAIKH NIDA SHOYEB MAHMAD
**ADDRESS**
AZAM CHOWK, LABOUR COLONY,
LATUR,413512, MAHARASHTRA, INDIA.

### ग्रामपंचायत कार्यालय, श्याम नगर १२ नं. पाटी ता. जि. लातूर.

**जाहिर प्रगटन**

मौजे हरंगुळ बु. ता. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, विजयकुमार पिता संताराम वक्राणी रा. ग्रेन मार्केट, लातूर, यांची जागा / घर नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दि. ३०/९/२०२२ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि. क्र. ४२५६/१२ दि.२९.०३.२०१२
सदर जागेची / घराची चुतःसिमा पुढील प्रमाणे आहे.
पु.- ९ मीटर रुंदीचा रस्ता प. प्लॉट नंबर २५
द.- प्लॉट नंबर ३३ उ. प्लॉट नंबर ३५

| गट. नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| ३९४/१ पैकी प्लॉट नंबर ३४ पुर्ण ग्रामपंचायत नंबर १९२ पुर्ण | पु.प.१२.५ मी. द.उ.१३. मी. एकूण क्षेत्रफळ १६२.५ चौ. मी. | **श्री. विजयकुमार पिता संताराम वक्राणी.** | **श्री. व्यंकट पिता शंकरराव रणखांब** |

किंमत १,२५,००० :- सदर आतील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. लेखी तक्रार अर्ज करावा. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत :-**
**ग्रामसेवक/सरपंच**



यशवंत

गुरुवार दि. ३ ऑक्टोबर २०२४

पान ८

उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com


## श्रीक्षेत्र जगदंबा आई मंदिर सोमनाथपुर येथे विभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक पुजा





# उदगीर नगरपरिषदे द्वारे स्वच्छता हीच सेवा पंधरवडा समारोप विविध उपक्रमाने संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** स्वच्छ भारत अभियानाचा १० वर्धापनदिन उदगीर नगरपरिषदे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या मार्गदर्शनाने विविध उपक्रम घेवून साजरा करण्यात आला. दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२४ दरम्यान ङ्ग स्वच्छता हीच सेवाङ्घ या पंधरवडा मध्ये नागरिक, विद्यार्थी यांच्या मध्ये स्वच्छता विषयक जनजागृती करण्यासाठी स्वच्छता शपथ, मखमल बावडी, घरो घरी जागरूकता (वीं ीं वीं ुरीश-पर्शीी), एक पेड माँ के नाम, मास क्लीन ड्राईव, संपूर्ण स्वच्छता अंतर्गत प्रमुख रस्ते व नाला सफ्फ़ाई, सार्वजनिक शौचालय स्वच्छता, गार्डन सुशोभीकरण, स्वछता ही सेवा शालेय निबंध स्पर्धा, सफ्फ़ाई मित्र सुरक्षा शिबीर, वेस्ट टू आर्ट शिल्पकला, स्वच्छता रॅली, ठठठ अंतर्गत माणुसकीची भिंत, सफ्फ़ाई मित्र सुरक्षा आरोग्य तपासणी शिबीर, मास क्लीन ड्राईव बुद्ध विहार व सभोवतालचा परिसर, क्लीन ड्राईव उदयगिरी किल्ला इ. उपक्रम घेण्यात आले.

स्वच्छता हीच सेवा या पंधरवडयाची सांगता आज दि.०२ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा ते नऊ या वेळेत नगरपरिषद मुख्याधिकारी, अधिकारी कर्मचारी व पोस्तेपतदार इंग्लिश स्कूल चे संचालक, प्राचार्य, शिक्षक, मोठ्या संख्येने विद्यार्थी यांनी उदगीर शहर पोलीस स्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराजचौक, छत्रपती शाहू महाराज चौक, कॅप्टन कृशाकांत चौक हा मुख्य रस्ता तसेच हुतात्मा स्मारक उद्यान या परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आले. तर पोस्तेपोदार स्कूलच्या वतीने स्वच्छता कर्मचारी यांचा भेट वस्तू देवून सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, जळकोट नगरपंचायत चे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, पोस्ते पोदार स्कूल चे संचालक सुरज पोस्ते यांनी मार्गदर्शन करतांना आपले उदगीर स्वच्छ व सुंदर राहावे यासाठी सर्वांनी नगरपरिषद प्रशासनास सहकार्य करावे, नागरिक व विद्यार्थ्यंनी देखील स्वच्छतेच्या उपक्रमात सहभागी होवे असे आवाहन केले.

उदगीर नगर परिषदेद्वारे स्वच्छता हीच सेवा - ङ्गस्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छताङ्घ या पंधरवड्याचे समारोप करताना सकाळी ११.०० वा नगरपरिषद सभागृहां मध्ये स्वच्छता हीच सेवा या विषयावरती शहरातील विविध शाळेमध्ये निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या भक्ती उमाकांत बिरादार, इयत्ता नववी - विद्यावर्धिनी माध्यमिक विद्यालय हिला रुपये २१००/-चा धनादेश, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, द्वितीय क्रमांक सुमित राहुल गोणे, इयत्ता नववी- साने गुरुजी माध्यमिक विद्यालय याला रुपये १५००/- धनादेश, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र तर तृतीय क्रमांक भक्ती दिनेश देवनाळे, इयत्ता आठवी लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय रुपये १०००/- धनादेश, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

उदगीर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणारे आमचे स्वच्छताचे विभागाचे अधिकारी कर्मचारी यांचा उत्कृष्ट कामगिरी व योगदानाबद्दल स्वच्छता विभाग अ मधून प्रभारी स्वच्छता निरीक्षक शेख सिकंदर, दैवशाला महादळे ,रमेश गायकवाड, सतीश सोनकांबळे. स्वच्छता विभाग ब मधून प्रभारी स्वच्छता निरीक्षक अमित सुतार, गिरीजा मादळे, अनिल कांबळे, अब्दुल रज्जाक. स्वच्छता विभाग क मधून प्रभारी स्वच्छता निरीक्षक उमाकांत गंडारे, संगुबाई गुडपाळे, मधुकर सूर्यवंशी, बब्रुवान शिंदे तर स्वच्छता विभाग ड मधून प्रभारी स्वच्छता निरीक्षक विनोद रंगवाळ, छायाबाई मादळे, गंगाधर गवारे, श्रीनिवास कांबळे आधी स्वच्छता मित्रांचा प्रातनिधिक स्वरुपात प्रशस्तीपत्र, शाल व पुष्पगुच्छ देवून सेवा गौरव करण्यात आला.

तसेच उदगीर नगरपरिषद, कारवा फाउंडेशन, कोनाळे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने उदगीर स्कॉलर२०२४ ही विविध शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उदगीर शहराबद्दलची सांस्कृतिक, ऐतिहासिक व स्वच्छतेचे अनुषंगाने बाबी माहिती असाव्या या अनुषंगाने एमसीक्यू परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षा पाचवी ते सातवी या गटात प्रथम ज्ञानेश्वर परमेश्वर नरहरे, इयत्ता सहावी माउंट लीट्ररा झी स्कूल याला नगरपरिषदेच्या वतीने टॅब व प्रशस्तीपत्र, द्वितीय क्रमांक शेख अजमेरी दस्तगीर, इयत्ता सहावी पंडित दीनदयाळ उपाध्य शाळा हिला कोनाळे क्लासेसच्या वतीने सायकल व प्रशस्तीपत्र तर तृतीय क्रमांक प्रांजल भगवान पाटील, इयत्ता सातवा लालबहादूर माध्यमिक प्राथमिक शाळा हिला कारवा फ्फ़ाउंडेशनच्या वतीने स्मार्ट वॉच व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच आठवी ते दहावी या गटात प्रथम क्रमांक श्रेया सुनील कुलकर्णी, इयत्ता नववी लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय हिला नगरपरिषदेच्या वतीने टॅब व प्रशस्तीपत्र, द्वितीय क्रमांक अर्जुन चंद्रकांत चैलंबो, इयत्ता आठवी माउंट लीट्ररा झी स्कूल याला कोनाळे क्लासेस च्या वतीने सायकल व प्रशस्तीपत्र तर तृतीय क्रमांक टी विक्रांत वासुदेव इयत्ता आठवी विद्यावर्धिनी इंग्लिश स्कूल याला कारवा फ्फ़ाउंडेशनच्या वतीने स्मार्ट वॉच व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना स्वच्छता शपथ देण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीर नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, प्रमुख मार्गदर्शक मुख्याधिकारी सुंदर बोंदर, कारवा फ्फ़ाउंडेशनचे गुरुप्रसाद पांढरे, ओमकार गांजुरे, कोनाळे क्लासेसचे जशन डोळे, मुकेश निरुने आदी होते यावेळी मान्यवरांनी बोलताना आपले उदगीर स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान यामध्ये प्रथम येण्यासाठी नागरिकांनी देखील सक्रिय सहभाग नोंदवून स्वच्छता, वृक्ष लागवड व पाण्याचा योग्य वापर करून जागरूक राहून प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शहर समन्वयक प्रफ्फ़ुल अदावळे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर अभियान व्यवस्थापक महारुद्र गालट यांनी केले तर कार्यक्रमास शालेय विद्यार्थी, पालक, शिक्षक, नगरपरिषदेचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच क्लीनलीनेस टार्गेट युनिट अंतगर्त तळवेस विसर्जन विहीर व परिसर स्वच्छता करण्यात आली तर एक पेड मा के नाम अंतर्गत नगरपरिषदेचे वाचनालय तळवेस येथे वृक्षारोपण करण्यात आले.

# घटस्थापनेने नवरात्र उत्सवास प्रारंभ

**उदगीर (प्रतिनिधी)** शहरालगत असलेल्या सोमनाथपुर येथील श्रीक्षेत्र जगदंबा आई मंदिरात बुधवार दि. ०२ ऑक्टोबर रोजी जगदंबा आईची विधिवत पुजा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व सौ.स्वाती दाभाडे शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक पुजा करुन घटस्थापना करण्यात आली.

सोमनाथपुर येथील श्रीक्षेत्र जगदंबा आई मंदिरात नवरात्र महोत्सव २ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अश्विन शुध्द दशमी विजया दशमी दसरा पर्यंत उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात.

जगदंबा देवीची स्थापना उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व सौ. स्वाती दाभाडे (शिंदे) उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांच्या सपत्नीक जगदंबा देवीची स्थापना महापुजा आरती , अष्टकोत्तर कलश पुजा , पंचामृत अभिषेक पुजा करण्यात आली. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांचे माता पिता सौ. सुरेखा लक्ष्मण शिंदे व लक्ष्मण शिंदे उपस्थित होते. यावेळी तलाठी बाबासाहेब कांबळे, मंडळ अधिकारी शंकर जाधव उपस्थित होते.

श्रीक्षेत्र जगदंबा आई मंदिरात सिंहासन पुजा, छबिना, पालखी पुजा, भजन, किर्तन, भारुड, तिपरे, दहिहंडी, काला प्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडतात. या नवरात्र उत्सवात समर्थ सेविका भजनी मंडळ व गोपाळ जोशी याचा भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नवरात्र उत्सव धार्मिक विधी व उत्सव पार पाडण्यासाठी जगदंबा आई मंदिरच्या वतीने गिरी परिवार परिश्रम घेत आहेत.

उदगीर शहर व परिसरातील भाविक भक्तांनी जगदंबा आई मंदिरात नवरात्र उत्सवात सहभागी होवून दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन गिरी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# नाफेड खरेदीसाठी नोंदणी सुरु

**उदगीर (प्रतिनिधी)** नाफेडच्या वतीने सोयाबीन, उडीद,मुग या धान्याची सरकारी नाफेड खरेदीसाठी नोंदणी चालु असुन शेतकऱ्यांनी रंगराव पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती, नळेगाव रोड उदगीर येथे ई-पिक पाहणी केलेला ७/१२, ८ अ आधारकार्ड, बँकेचे पासबुक घेवून नोंदणी करावी असे आवाहन रंगराव पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने भास्कर पाटील यांनी केली आहे.

# युवा उद्योजक बाळासाहेब पाटोदे यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष अजित पवार गटात प्रवेश



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील युवा उद्योजक बाळासाहेब शंकरराव पाटोदे यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात पक्षाचे नेते राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. यावेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले दावणगाव सोसायटीचे व्हाईस चेअरमन धनाजी मुळे आदीसह प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाळासाहेब पाटोदे यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी ना.संजय बनसोडे यांनी दिवस-रात्र प्रयत्न करत असुन त्यांच्या खांद्याला खांदा लावून या विकास कार्यात सहभागी होण्यासाठी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याचे सांगितले. मी ठेकेदारी करण्यासाठी किंवा आर्थिक लाभ घेण्यासाठी प्रवेश केला नसून ना. संजय बनसोडे यांचेसारखे नेते मतदार संघाचे विकासासाठी रात्रंदिवस धडपडत आहेत अनेक प्रलंबित असलेले विकासाचे प्रश्न पूर्ण करण्यासाठी ना. बनसोडे यांनाच आपण साथ दिली पाहिजे यासाठी मी प्रवेश करीत असल्याचे सांगितले.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी मी तुमच्या पाठीशी आहे. मतदारसंघातील ज्या काही अडचणी आहेत त्या सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करा. ना.संजय बनसोडे यांना साथ द्या असे म्हणून आशिर्वादाची थाप मारली. शासकीय विश्रामगृह उदगीर येथील या प्रवेश सोहळ्यावेळी अनेक मान्यवर कार्यकर्ते व नेते उपस्थित होते.

# लातूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ उदगीर सर्व साधारण सभा संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** लातूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ मर्या. उदगीर या संघाची ३८ वी वार्षीक सर्व साधारण सभा दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी शनिवारी दुपारी ठिक २.०० वाजता संघाचे मुख्य कार्यालय उदयगिरी औद्योगीक वसहात लोणी येथे खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यात सर्व विषयाला टाळयाच्या गजरात मंजुरी देण्यात आली. यात संघाचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र सुर्यवंशी यांनी सर्व प्रथम दुध उत्पादक संस्था प्रतिनिधी याचे आभार मानले व लातूर जिल्हा दुध संघ हा आता दुग्धजन्य पदार्थ निर्मिती करण्याकरीता अद्यावत यंत्र सामुग्री उभ केलेली आहे. दि. ३० सप्टेंबर २०२४ पासून महानंद नावाने पिशवी बंद दूध मार्केटमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. व तसेच १५ दिवसांनी दही, ताक, लस्सी, क्रिम, तूप, सुगंधी दुध, पनीर इत्यादी उत्पादन तयार होणार आहेत. तरी या कामासाठी माझ्यावर सर्व संचालक व दूध उत्पादक यांनी विश्वास टाकला त्यामुळे मी हे काम करु शकलो याचा फायदा सर्व दूध उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

तसेच आपण एनडीडीबी च्या आयडीडीपी योजनेतून मिळालेली मशिनरी ही महानंद कडून घेतली परंतू त्यासाठी लागणारे बॉयलर, प्रोसेस प्लॅंट, कोल्ड स्टोअरेज, इलेक्टीसीटी या साठी लागणारा पैसा हा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेनी मदत केली यात मा. मंत्री मा. दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी मदत केली म्हणून मी हे सर्व करु शकतो तर मी त्यांचे खूप खुप आभारी आहे असे सांगीतले हा कार्यक्रमास संघाचे संचालक विजयकुमार काळे, रमाकांत श्रीरंग तिवघाळे, व्यंकट पस्तापुरे, सौ. दैवशाला कंजे, ज्ञानोबा सुर्यवंशी, हणमंत मंदे, माधव डोरले, भरतबाई माने, मिनाबाई पाटील, प्रकाश सोळंके व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते व सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व शेवटी संघाचे कार्यकारी संचालक रामराव बिरादार यांनी आभार व्यक्त करुन सभा संपन्न झाली असे सांगीतले.

## : तापमान:

कमाल - ३३.२ से.

किमान - २५.४ से.

आर्द्रता - ६४.००

पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर


## बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ५.००% | ५.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | १०.००% | १०.५०% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.५०% | ११.००% |

**मासिक प्राप्ती योजना :-** आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८६७/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३६ महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (१०.५०%)

**दाम दुप्पट योजना :-** रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**आवर्तक ठेव योजना (RD) :-** (०१/१०/२०२३ पासुन लागू)

| अ.क्र | मुदत/कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १ | १३ ते २४ महिने | ९.२५% |
| २ | २५ ते ३६ महिने | ९.५०% |
| ३ | ३७ ते ६० महिने | १०.२५% |
| ४ | ६० महिने ते पुढे | ९.००% |